दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१०१ | बुधवार दि.०१ जुलै २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### महाराष्ट्राच्या सत्तेचं नवं गणित !

महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या चार वर्षांत अशक्य वाटणाऱ्या अनेक घडामोडी वास्तवात उतरल्या. २०२२ मधील शिवसेनेतील बंड, त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमधील फूट आणि आता ठाकरे गटातील सहा खासदारांचे पक्षांतर या घटनांनी राज्याच्या राजकीय समीकरणांना कायमस्वरूपी बदलून टाकले आहे. त्यामुळे आज कोण कुठे जाईल आणि पुढचा राजकीय भूकंप कुठे होईल, याचा अंदाज बांधणेही कठीण झाले आहे.

# जुलैतही पावसाची ओढ

## शेती पुन्हा संकटाच्या उंबरठ्यावर, शेतकऱ्यांची चिंता वाढली

पुणे । प्रतिनिधी

**जून महिन्यात समाधानकारक पाऊस न झाल्याने आधीच अडचणीत सापडलेल्या राज्यातील शेतकऱ्यांसाठी आणखी एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. भारतीय हवामान विभागाने जुलै महिन्यातही महाराष्ट्रातील बहुतांश भागात सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज व्यक्त केल्याने खरीप हंगामावर मोठे संकट निर्माण झाले आहे. पेरणी केलेल्या पिकांचे अस्तित्व धोक्यात आले असून, अनेक ठिकाणी शेतकरी दुबार पेरणीच्या भीतीने हवालदिल झाले आहेत.**



यंदा मॉन्सूनचे आगमन उशिरा झाले आणि जून महिन्यात महाराष्ट्रात सरासरीपेक्षा तब्बल ४७ टक्के कमी पाऊस झाला. त्यामुळे अनेक जिल्ह्यांमध्ये पेरण्या खोळंबल्या, तर ज्या शेतकऱ्यांनी धाडसाने पेरणी केली त्यांच्या पिकांना आता पावसाअभावी ताण बसू लागला आहे. अशा परिस्थितीत जुलै महिन्यातही पावसाचा जोर कमी राहणार असल्याचा हवामान विभागाचा अंदाज शेतकऱ्यांच्या चिंतेत आणखी भर घालणारा ठरला आहे.ङ्गहवामान विभागाच्या अंदाजानुसार विदर्भ आणि मराठवाड्यातील काही भाग वगळता मध्य महाराष्ट्र, कोकण आणि मराठवाड्याच्या बहुतांश भागात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे. खरीप हंगामासाठी जुलै महिना अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. याच काळात पिकांची वाढ होत असते. मात्र, पावसाने साथ दिली नाही तर सोयाबीन, कापूस, तूर, मका आणि इतर खरीप पिकांच्या उत्पादनावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पावसाअभावी धरणांमधील पाणीसाठ्यावरही परिणाम होण्याची शक्यता आहे. सिंचनासाठी पाण्याची टंचाई निर्माण झाल्यास त्याचा फटका केवळ खरीपच ▶▶ पान २ वर

## राज्यातील एनएचएम चे १५ हजार कंत्राटी कर्मचारी झाले नोकरीत कायम

● ७ व्या वेतन आयोगानुसार मिळणार पगार




मुंबई । प्रतिनिधी

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राज्यभर कार्यरत असलेल्या १० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक सेवा पूर्ण केलेल्या १५ हजार १० कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा समायोजनाचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. या कर्मचाऱ्यांसाठी समकक्ष वेतनश्रेणीतील अधिसंख्य पदे निर्माण करण्यास आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या वार्षिक ११५३.६० कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता देणारा शासन निर्णय मंगळवारी निर्गमित केला आहे. या निर्णयामुळे राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, सार्वजनिक ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### राज्यात चार दिवस मुसळधार पावसाची शक्यता

पुणेः हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, बंगालच्या उपसागरात पुन्हा कमी दाबाचे क्षेत्र तयार होत आहे. ज्यामुळे ३ ते ७ जुलै दरम्यान राज्यात पावसाची शक्यता आहे. या काळात सागरी किनारपट्टीवर मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर विदर्भ आणि मराठवाड्यात देखील ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. यावर्षी एल निनोमुळे पाऊस कमी आहे. हे आधीच सांगितले आहे. मॉन्सुनचे वारे कमकुवत आहेत. एल निनोचा परिणाम पुढील वर्षी देखील जाणवणार असला तरी पुढील वर्षीच्या पावसाचा अंदाज आता सांगता येणार नाही, अशी माहिती हवामान विभागाचे शास्त्रज्ञ एस डी सानप यांनी दिली आहे.

### आसाराम बापूच्या शिक्षेला स्थगिती नाही–न्यायालय

दिल्लीः अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या स्वयंघोषित अध्यात्मिक गुरु आसाराम बापूला सर्वोच्च न्यायालयाकडून दिलासा मिळालेला नाही. राजस्थान उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या त्याच्या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने जामीन देण्यास नकार दिला. केवळ आसारामची प्रकृती गंभीर झाल्यास किंवा त्याच्या जीवाला धोका निर्माण झाल्यासच जामिनाबाबत विचार केला जाईल, असेही न्यायमूर्ती एम.एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती शील नागू यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले.

### एमपीएससी ऑनलाइन परिक्षेचा निर्णय रद्द करा

मुंबईः महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) घेतल्या जाणाऱ्या ऑनलाइन परिक्षा रद्द करण्याची मागणी काँग्रेसचे आमदार सतेज पाटील यांनी सोमवारी केली. त्यांनी गैरप्रकार आणि अनियमिततेच्या शक्यतांचा मुद्दाही विधानपरिषदेत उपस्थित केला. पाटील यांनी म्हटले की, एमपीएससीने ऑफलाइन परीक्षा यशस्वीपणे घेऊन लोकांचा विश्वास निर्माण केला आहे, ज्यामुळे सरकारी धोरणे कार्यक्षमतेने अंमलात आणण्यास सक्षम अधिकारी निर्माण झाले आहेत. संगणक–आधारित चाचण्यांकडे (सीबीटी) स्थलांतर केल्याने, विश्वासार्ह प्रणाली खराब होईल. एमपीएससीच्या परीक्षा थेट ऑफलाइन पद्धतीने घेतल्या जाव्यात. संगणक–आधारित चाचणी लागू करण्याचा निर्णय मागे घेण्यात यावा. सरकारने परीक्षा प्रक्रियेतील सामान्यीकरण, पारदर्शकता आणि निष्पक्षता याविषयी विद्यार्थ्यांच्या चिंता दूर कराव्यात. एमपीएससीची प्राथमिक जबाबदारी परीक्षा घेणे आहे, त्यांना आउटसोर्स करणे नाही, असे पाटील म्हणाले.

# सचिन अहिर यांनी ठाकरेंची साथ सोडली

## शिंदेंच्या सेनेकडून उपसभापतीपदासाठी भरला अर्ज

मुंबई । प्रतिनिधी

**सहा खासदारांच्या फुटीनंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना आणखी एक मोठा धक्का बसला आहे. विधान परिषदेच्या उपसभापतीपदाच्या निवडणुकीसाठी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून आमदार सचिन अहिर यांनी मंगळवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. सचिन अहिर हे ठाकरेंचे अत्यंत विश्वासू नेते मानले जात होते. वरळी विधानसभा मतदारसंघात आदित्य ठाकरेंना निवडून आणण्यात अहिर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. आता त्यांनी ठाकरेंची साथ सोडत शिंदे यांच्यासोबत जाणे पसंत केले आहे.**

सचिन अहिर यांनी विधान परिषदेच्या उपसभापतीपदाच्या निवडणुकीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार, मंत्री चंद्रकांत पाटील, संजय शिरसाट, आमदार कृपाल तुमाने, मनिषा कायंदे, दुष्यंत चतुर्वेदी, चंद्रकांत रघुवंशी यांच्या उपस्थितीत अर्ज दाखल केला. उद्धव ठाकरे यांचे फुटीर मतदारसंघात दौरे सुरु असतानाही ही राजकीय घडामोड घडली.



सचिन अहिरांचा विधान परिषद सदस्यत्वाचा कार्यकाळ २०२८ पर्यंत आहे. त्यापूर्वीच त्यांनी शिंदे यांच्यासोबत जाण्याचा निर्णय घेतला. आज सचिन अहिर यांच्या उपस्थित ▶▶ पान २ वर

### ● 'टायगर'नव्हे, 'ऑपरेशन देवेंद्र फडणवीस'

आदित्य ठाकरे म्हणाले, माझा भाजप आणि संघाच्या लोकांना सवाल आहे की, एवढे सगळे लोक तुम्ही डोक्यावर बसवून घेतले आहेत, त्यात अजून उपसभापतिपदावर बसवले आहे. का नाही कोणी भाजपचा तिथे बसलेला आहे? आज इतके वर्ष घरदार सोडून भाजपसाठी काम करणारे लोक आहेत, त्यांना का नाही बसवले? हे उपरे का बसवून घेतले? याचा भाजपने विचार केला पाहिजे. त्यामुळे मी पुन्हा सांगतो की हे 'ऑपरेशन टायगर' नसून 'ऑपरेशन देवेंद्र फडणवीस' आहे.

## एचएसआरपी नंबर प्लेट नसेल तर आजपासून कारवाई-परिवहन मंत्री




मुंबई । प्रतिनिधी

**आज १ जुलै पासून सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट (एचएसआरपी) बंधनकार असेल. याआधी पाच वेळा मुदतवाढ दिली असून पुन्हा मुदतवाढ मिळणार नाही, आता ठोस कारवाई केली जाणार, असे राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मंगळवारी (दि. ३०) स्पष्ट केले.**

१ एप्रिल २०१९ नंतरच्या नव्या वाहनांना कंपनीकडून नंबर प्लेट मिळत होती. १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत झालेल्या सर्व वाहनांना आता (एचएसआरपी) बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र अनेक वाहने हे विना एचएसआरपी नबंरप्लेटशिवाय धावत आहेत. वारंवार मुदतवाढ देऊनही एचएसआरपी नबंर प्लेटबाबत वाहनधारकांमध्ये उदासीनता दिसून येत असून, दि. ३० जून रोजी नंबरप्लेट बसविण्याची ▶▶ पान २ वर

## रेल्वेचे इंटरलॉकिंगचे काम पुर्ण; लवकरच बीड–पुणे–मुंबई धावणार रेल्वे

बीड । प्रतिनिधी

अहिल्यानगर–बीड–परळी रेल्वे मार्गाचे काम गतीने सुरू आहे. सद्यस्थितीत वडवणीपर्यंतचे रेल्वेचे काम पुर्ण झालेले असून आता आष्टी ते बीडपर्यंतचे रेल्वे इंटरलॉकिंगचे काम पुर्ण झाले आहे. यामुळे बीड–पुणे–मुंबई रेल्वे धावण्याचा मार्ग मोकळा झाला असून दि.१७ सप्टेंबरपासून बीड–पुणे–मुंबई रेल्वे सुरू होईल, अशी माहिती खा.बजरंग सोनवणे यांनी दिली.



दि.३० जून रोजी खा.बजरंग सोनवणे यांनी बीड जिल्ह्यातील रेल्वे, महावितरण विभागाची आढावा बैठक आयोजीत करण्यात आली होती. बैठकीला जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांची उपस्थिती होती. यावेळी रेल्वे विभागाच्या बैठकीत खा.बजरंग सोनवणे यांनी आष्टी ते परळी रेल्वे मार्गाचा आढावा घेतला.अहिल्यानगर–बीड–परळी रेल्वेमार्गातील ▶▶ पान २ वर

## राम मंदिरातील गैरव्यवहारावर पंतप्रधानांचं मौन का?

### भक्तांच्या पैशांचा हिशेब कोण देणार? राज ठाकरेंचा सवाल

मुंबई । प्रतिनिधी

अयोध्येतील श्रीराम मंदिरातील देणग्या आणि हुंडीत जमा होणाऱ्या निधीच्या कथित गैरव्यवहाराच्या आरोपांवरून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. या प्रकरणात विशेष तपास पथकाच्या प्राथमिक अहवालाचा उल्लेख करत, मंदिरातील देणगी, दागदागिने आणि आर्थिक व्यवहारांची पारदर्शक चौकशी व्हावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर प्रसिद्ध केलेल्या सविस्तर भूमिकेत म्हटले आहे की, अयोध्येतील श्रीराम मंदिरात भक्तांकडून मोठ्या प्रमाणावर ▶▶ पान २ वर

## अवैध डान्स बार रोखण्यासाठी पोलीस कायद्यात दुरुस्ती होणार–फडणवीस

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात डान्स बारवर नियंत्रण ठेवण्यासाठी करण्यात आलेल्या विद्यमान कायद्यातील पळवाटा बंद करण्यासाठी राज्य सरकार महाराष्ट्र पोलीस अधिनियमात दुरुस्ती करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले. या दुरुस्तीनंतर डान्स बार चालविण्यासाठी महाराष्ट्र डान्स बार कायद्यांतर्गतच परवाना घेणे बंधनकारक राहील. पोलीस कायद्यांतर्गत केवळ सादरीकरण (परफॉर्मिंग लायसन्स) घेऊन डान्स बार चालविण्याची ▶▶ पान २ वर

## ओलिस ठेवलेल्या महाराष्ट्रातील तरुणांची सुटका करा

### धनंजय मुंडेंची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

मुंबई प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील नांदूर घाट येथील रहिवासी स्वप्नील काळुंके यांसह अनेक तरुणांना मोठ्या पगाराचे आमिष दाखवून म्यानमार – थायलंड सीमेवर एका छळ छावणीत ओलिस ठेऊन त्यांच्याकडून जबरदस्तीने सायबर गुन्हे घडवले जात असल्याचे समोर आले असून, या प्रकरणी राज्य शासनाने गंभीर दखल घेत केंद्र सरकारच्या मदतीने या सर्व तरुणांची सुखावून सुटका करावी, अशी मागणी माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी लेखी पत्राद्वारे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री महोदयांची विधानभवन येथे भेट घेत विनंतीचे पत्र दिले आहे.

बीड जिल्ह्यातील स्वप्नील काळुंकेसह महाराष्ट्रातील विविध ठिकाणचे २०–२५ तरुण ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.३० जून २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: १६५.५० क्विंटल | २,२९७ | २,५६० | २,४६९ |
| ज्वारी/हायब्रिड: १७२.५० क्विंटल | २,२०० | ४,१७१ | २,८५९ |
| मका/लोकल: ४.०० क्विंटल | १,८१० | २,०५० | १,९३० |
| तूर : ५.५० क्विंटल | ६,१०० | ७,००० | ६,५५० |
| उडीद : ०.५० क्विंटल | ५,८०० | ५,८०० | ५,८०० |
| बाजरी: ६१.५० क्विंटल | २,०२१ | ३,१९१ | २,५६० |
| मुग: ४.०० क्विंटल | ७,००१ | ७,००१ | ७,००१ |
| सोयाबीन:७.५० क्विंटल | ६,५०० | ६,६०० | ६,५५० |
| हरभरा: १.५० क्विंटल | ४,००० | ५,३०१ | ४,६५० |

# आरक्षणाच्या उपवर्गीकरणावरून विधानसभेत गोंधळ

## विरोधकांचा सभात्याग..! व्यापक चर्चेअंती निर्णय घेऊ–मुख्यमंत्र्यांचे आश्वासन

मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्रात अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणावर सखोल चर्चेच्या मागणीसाठी विरोधकांनी विधानसभेत गोंधळ घालून सभात्याग केला. हा विषय फार महत्त्वाचा आणि गंभीर असून दलित समाजावर अन्यायकारक आहे अशी टीका विरोधकांनी केली. या विषयावर व्यापक चर्चेअंती, सर्व सहमतीने निर्णय घेऊ,कोणावरही अन्याय केला जाणार नाही अशी स्पष्ट भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत मांडली.**



विरोधकांनी दिलेले स्थगन प्रस्ताव विधानसभा अध्यक्षांनी नाकारल्यानंतर काँग्रेस सदस्य विजय वडेट्टीवार यांनी विनंती केल्यानंतर त्यांना अध्यक्षांनी बोलण्याची परवानगी दिली. काँग्रेसचे विजय वडेट्टीवार म्हणाले, दलित समाजाला एकमेकांविरोधात आणणे योग्य नाही. समितीचा अहवाल येईपर्यंत सरकारने कोणताही निर्णय घेऊ नये. आज या निर्णयाविरोधात ५ लाख लोक आंदोलनासाठी रस्त्यावर उतरले आहेत. अनुसूचित जातीमधील उपेक्षित माणसाला न्याय मिळाला पाहिजे. यामध्ये एकूण ५९ जातींचा समावेश आहे. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी राज्य सरकारची भूमिका स्पष्ट केली. या प्रकरणी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या निवेदनानंतरही विरोधकांनी या विषयावर सखोल चर्चेची मागणी केली. मात्र अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी त्यांना बोलण्याची संधी नाकारली. मुख्यमंत्र्यांच्या निवेदनानंतरही विरोधकांचा गोंधळ सुरू होता तेव्हा आपण कोणतेही नियमबाह्य काम करणार नाही असे विधानसभा अध्यक्षांनी स्पष्ट केले. तरीही विरोधकांच्या गोंधळ सुरू होता. विजय वडेट्टीवार, नाना पटोले यांच्यासह विरोधी सदस्य वेलमध्ये उतरले होते. अखेर या विषयावर विरोधकांनी सभात्याग केला. दलित समाजाला न्याय देण्यासाठी नियमबाह्य काम करू नका असे अध्यक्षांनी विरोधकांना सुनावले. या विषयावर निवृत्त न्यायाधीश अनंत बदर यांच्या ▶▶ पान २ वर

## चक्क विद्यार्थ्याचा शिक्षकावर चाकू हल्ला

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगरमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. शाळेतून टीसी (दाखला) काढण्यासाठी आलेल्या एका अल्पवयीन विद्यार्थ्याने चक्क आपल्या वर्गशिक्षकावर चाकूने हल्ला केला. जखमी शिक्षकांना तातडीने उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगरमधील छावणी परिसरात ही घटना घडली आहे. २०२३ या वर्षांमध्ये आरोपी अल्पवयीन विद्यार्थी या शाळेत शिक्षण घेत होता. मात्र दुसरीकडे नोकरी लागल्यामुळे टीसी काढण्यासाठी तो शाळेत आला असताना ही घटना घडली. यामध्ये विद्यार्थी नववीत शिकत असताना विशाल धूशिंग हे त्याचे वर्गशिक्षक होते. मात्र यावेळी तो परीक्षेत नापास झाला होता. याच अपयशाचा सूड ▶▶ पान २ वर

cmyk



अग्रलेख

# फडणवीस, शिंदे आणि दिल्ली; महाराष्ट्राच्या सत्तेचं नवं गणित!

महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या चार वर्षांत अशक्य वाटणाऱ्या अनेक घडामोडी वास्तवात उतरल्या. २०२२ मधील शिवसेनेतील बंड, त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमधील फूट आणि आता ठाकरे गटातील सहा खासदारांचे पक्षांतर या घटनांनी राज्याच्या राजकीय समीकरणांना कायमस्वरूपी बदलून टाकले आहे. त्यामुळे आज कोण कुठे जाईल आणि पुढचा राजकीय भूकंप कुठे होईल, याचा अंदाज बांधणेही कठीण झाले आहे.

ठाकरे गटातील सहा खासदारांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर या संपूर्ण घडामोडीला ''ऑपरेशन टायगर'' असे नाव देण्यात आले. मात्र, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी या दाव्याला वेगळे वळण देत, ''हे ऑपरेशन टायगर नसून ऑपरेशन फडणवीस आहे,'' असा आरोप केला. त्यांच्या या विधानाने महाराष्ट्राच्या राजकारणात नवी चर्चा सुरू झाली. हा केवळ आरोप नाही, तर महायुतीतील अंतर्गत सत्तासंतुलनावर बोट ठेवणारा राजकीय संदेश असल्याचे मानले जात आहे.

अलीकडील घडामोडींकडे पाहिले, तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे राजकीय वजन सातत्याने वाढताना दिसते. सहा खासदारांच्या पक्षप्रवेशानंतर लोकसभेतील त्यांची ताकद वाढली असून, भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाकडूनही त्यांना अधिक पाठबळ मिळत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. विशेष म्हणजे पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापेक्षा एकनाथ शिंदे यांच्याच हालचाली अधिक चर्चेत राहिल्या. त्यांच्या आत्मविश्वासपूर्ण देहबोलीपासून ते आक्रमक राजकीय विधानांपर्यंत प्रत्येक गोष्टीत एक वेगळीच राजकीय ऊर्जा दिसून आली. या चर्चेला आणखी खतपाणी घालणारी घटना म्हणजे विधान परिषदेच्या उपसभापतीपदासाठी ठाकरे गटातील आमदार सचिन अहिर यांना उमेदवारी देण्यात आली. विशेष म्हणजे, स्वतःच्या पक्षातील इच्छुकांना डावलून शिंदे यांनी थेट ठाकरे गटातील महत्त्वाचा चेहरा आपल्या बाजूला वळवला. सचिन अहिर हे केवळ ठाकरे गटाचे आमदार नव्हते, तर उद्धव ठाकरे यांच्या विश्वासातील नेते म्हणून त्यांची ओळख होती. त्यामुळे या निर्णयाकडे केवळ एका उमेदवारीच्या दृष्टीने न पाहता, ''ऑपरेशन टायगर-३''ची सुरुवात म्हणून पाहिले जाऊ लागले आहे. गेल्या आठवड्यात विधानसभेत बोलताना एकनाथ शिंदे यांनी विरोधकांना ''आणखी झटके बसतील,'' असा इशारा दिला होता. त्यानंतर घडलेल्या राजकीय हालचालींमुळे त्या विधानाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. आता ठाकरे गटातील काही आमदारही शिंदे गटाच्या संपर्कात असल्याच्या चर्चा सुरू झाल्या असून, पावसाळी अधिवेशन संपल्यानंतर आणखी मोठ्या राजकीय घडामोडी घडू शकतात, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात अधिवेशनानंतर मोठे राजकीय निर्णय होण्याची परंपरा नवीन नाही. अधिवेशनाच्या काळात सर्व आमदार मुंबईत उपस्थित असल्याने संवाद, संपर्क आणि राजकीय रणनीती आखण्यासाठी हीच सर्वात अनुकूल वेळ मानली जाते. त्यामुळे सध्याच्या चर्चांकडे केवळ अफवा म्हणून दुर्लक्ष करता येणार नाही. दरम्यान, केंद्र सरकारच्या संभाव्य मंत्रिमंडळ विस्तारात खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना कॅबिनेट मंत्रीपद मिळण्याची चर्चा आहे. तसे झाल्यास केंद्रातही शिंदे गटाचे राजकीय महत्त्व वाढेल. दुसरीकडे, केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या खात्यात बदल होणार का, याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे. या संभाव्य निर्णयांमधूनही भाजपचे केंद्रीय नेतृत्व नेमका कोणता संदेश देत आहे, याचे विश्लेषण सुरू आहे. सहा खासदार गेल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या मतदारसंघांचा दौरा करून नुकसान भरून काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, ते मुंबईत परतताच अनेक पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिल्याच्या बातम्या समोर आल्या. यामुळे ठाकरे गटातील अस्वस्थता अद्याप कमी झालेली नसल्याचे स्पष्ट झाले. याच काळात उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत विमानप्रवास केला. त्यानंतर त्यांनी ''हे ऑपरेशन टायगर नसून ऑपरेशन फडणवीस आहे'' असे म्हणत, ''दिल्लीतून फडणवीसांचे पंख छाटले जात आहेत,'' असा राजकीय आरोप केला. त्याचवेळी राज ठाकरे यांनीही २०२९ च्या राष्ट्रीय राजकारणाचा संदर्भ देत प्रादेशिक पक्षांना वेगळ्या पद्धतीने हाताळले जात असल्याचे विधान केले. या दोन्ही विधानांमुळे महायुतीतील अंतर्गत सत्तासमीकरणांबाबत नव्या चर्चांना उधाण आले. राजकारणात प्रतिमा आणि प्रतीकांना मोठे महत्त्व असते. शिवसेना शिंदे गटाच्या खासदार डॉ. ज्योती वाघमारे यांनी ''एकनाथ शिंदे हे राम तर देवेंद्र फडणवीस हे लक्ष्मण'' अशी उपमा दिली. राज्याचा मुख्यमंत्री भाजपचा असूनही अशी उपमा देण्यात आली आणि त्यावर भाजपकडून कोणतीही सार्वजनिक प्रतिक्रिया आली नाही. त्यामुळे या मौनाचाही राजकीय अर्थ लावला जाऊ लागला. राजकारणात अनेकदा बोलण्यापेक्षा न बोलण्यातच मोठे संदेश दडलेले असतात. सध्या भाजपमध्ये पक्षप्रवेशाचे प्रमाण तुलनेने कमी असले, तरी शिंदे यांच्या शिवसेनेत सातत्याने इनकमिंग सुरू आहे. त्यामुळे महायुतीमध्येही शिंदे गटाचे महत्त्व वाढत असल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये निर्माण होत आहे. याचा परिणाम भविष्यातील जागावाटप, मंत्रिपदे आणि संघटनात्मक निर्णयांवरही होऊ शकतो. तथापि, या सर्व चर्चांच्या पलीकडे एक महत्त्वाचा मुद्दा आहे. महाराष्ट्रासमोर शेतकऱ्यांचे प्रश्न, दुष्काळाची शक्यता, बेरोजगारी, उद्योग, महागाई आणि पायाभूत सुविधांसारखी अनेक गंभीर आव्हाने उभी आहेत. पण राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू मात्र पक्षांतर, शक्तिप्रदर्शन आणि सत्तासमीकरणे याभोवतीच फिरताना दिसत आहे. लोकशाहीत राजकीय पुनर्रचना हा प्रक्रियेचा भाग असला तरी जनतेच्या मूलभूत प्रश्नांपेक्षा सत्तेचे गणित महत्त्वाचे ठरू लागले, तर लोकांच्या अपेक्षांचा भ्रमनिरास होण्याची भीती नाकारता येत नाही. आजच्या घडीला ''ऑपरेशन टायगर'' आणि ''ऑपरेशन फडणवीस'' या दोन्ही संकल्पना राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आहेत. मात्र, या चर्चांमध्ये किती तथ्य आणि किती राजकीय रणनीती आहे, हे येणारा काळच ठरवेल. पावसाळी अधिवेशन संपल्यानंतर जर आणखी पक्षांतर झाले, तर सध्याच्या चर्चांना अधिक बळ मिळेल; अन्यथा त्या केवळ राजकीय दावे-प्रतिदावे ठरतील. एक गोष्ट मात्र निश्चित आहेमहाराष्ट्राच्या राजकारणात स्थिरता हा शब्द आता दुर्मीळ झाला आहे. प्रत्येक आठवड्याला नवे समीकरण, नवा पक्षप्रवेश आणि नवी राजकीय कथा घडत आहे. त्यामुळे पुढचा राजकीय धक्का कोणाला बसणार, याकडे केवळ राज्याचेच नव्हे तर देशाच्या राजकारणाचेही लक्ष लागले आहे.

# लोकनेते विनायकराव मेटे यांना जयंतीनिमित्त सामुदायिक अभिवादन

## जयंतीनिमित्त डॉ.ज्योती मेटे यांचा मरणोत्तर देहदान आणि नेत्रदान करण्याचा समाजसेवेचा प्रेरणादायी संकल्प






**बीड । प्रतिनिध**

**दिवंगत लोकनेते विनायकराव मेटे यांच्या जयंतीनिमित्त मंगळवार, दि. ३० जून रोजी सकाळी १० वाजता बीड येथील कॅनॉल रोडवरील लोकनेते विनायकराव मेटे स्मृतीस्थळी सामुदायिक अभिवादन कार्यक्रम पार पडला.**

यावेळी विनायकराव मेटे यांच्या स्मृतीस्थळास पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि मराठा समाजाच्या न्यायहक्कांसाठी दिलेल्या योगदानाचा उपस्थितांनी गौरवपूर्ण शब्दांत उल्लेख करत त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला. या अभिवादन कार्यक्रमास शिवसंग्राम अध्यक्ष डॉ ज्योती मेटे, शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, अशोक हिंगे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिरम, नारायणराव काशीद, अनिल घुमरे, बी.बी. जाधव, संजय पवार , नारायणराव थोरात पत्रकार संतोष मानुरकर , वैभव स्वामी, बालाजी मारगुडे, के. के. वडमारे आदी सह त्यांच्यावर प्रेम करणारे असंख्य चाहते, कार्यकर्ते, पदाधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी विनायकराव मेटे यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या कार्याला विनम्र अभिवादन केले. संपूर्ण परिसरात भावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. बीड सह विविध जिल्ह्यातही विनायकराव मेटे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

### जयंतीनिमित्त ज्योती मेटे यांचा मरणोत्तर देहदान आणि नेत्रदान करण्याचा समाजसेवेचा प्रेरणादायी संकल्प

लोकनेते विनायकराव मेटे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या सहचारिणी डॉ. ज्योती मेटे यांनी मरणोत्तर देहदान आणि नेत्रदान करण्याचा संकल्प करून समाजापुढे मानवतेचा एक आदर्श ठेवला. जीवनभर समाजहितासाठी झटणाऱ्या विनायकराव मेटे साहेबांच्या विचारांना आणि सेवाभावी कार्याला हीच खरी आदरांजली आहे. मृत्यूनंतरही अनेकांना नवजीवन देण्याची प्रेरणा देणारा हा संकल्प समाजात जनजागृती निर्माण करणारा आणि मानवतेचा संदेश देणारा आहे.

### ७४ रक्तदात्यांचे रक्तदान

विनायकराव मेटे यांच्या ६३ व्या जयंती निमित्त ७४ रक्तदात्यांनी रक्तदान केले. शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर कोकाटे यांनी मांजरसुंभा आणि शिवसंग्राम सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे यांनी बीड येथे या रक्तदान शिबीराचे आयोजन केले होते.

# स्व.अजित स्मृती व्याख्यानमालेत बीड जिल्हा शिवसेनेचे अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**

**पत्रकार संघाच्या वतीने आयोजित करण्यात येत असलेल्या स्व.अजित स्मृती व्याख्यानमालेच्या पाचव्या कार्यक्रमात बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने स्व.दादांना अभिवादन करण्यात आले. जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप आणि जिल्हाप्रमुख ॲड.स्वप्नील गलधर यांच्यासह व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष अशोक शेटे, रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष राजूसेठ मुनोत,जेष्ठ पत्रकार जगदिश पिंगळे आदिंनी स्व.अजित दादांच्या आठवणींना उजाळा दिला.**

या कार्यक्रमाला जेष्ठ पत्रकार वसंत मुंडे, संपादक संतोष मानूरकर, जेष्ठ पत्रकार विश्वनाथ माणुसमारे, समाजसेविका आम्रपाली साबळे, भागवत तावरे, प्रतिक कांबळे, पत्रकार नितीन क्षीरसागर, शेख अदनान आदि मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी बोलतांना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप म्हणाले की, माझ्या राजकिय जीवनामध्ये शिवसेनाप्रमुख बाळासाहेब



ठाकरे, उध्दव ठाकरे, आमचे शिवसेना पक्षप्रमुख उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, स्व.गोपीनाथराव मुंडे या चार नेत्यानंतर अजित दादा पवार हे माझ्यासाठी एक भक्कम आधार होते. हे सर्व नेते मला 'अनिल' या नावाने बोलत असायचे. त्यांच्या बोलण्यामध्ये वडिलकीचा आणि मोठ्या भावासारखा आधार होता. बीड नगर पालिका निवडणूकीच्या माध्यमातून अजित दादांच्या सहवासात जाण्याचा योग आला. दादांसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची बनली होती. जेव्हा नगर पालिका अजित दादांच्या ताब्यात आली तेव्हा त्यांनी स्वत: माझा पुष्पगुच्छ देवून सत्कार केला होता. काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची जाण आणि कदर असणारा तो एक अव्दितीय लोकनेता होता. त्यांच्या अकाली जाण्याने बीड जिल्ह्याच्या विकास प्रक्रियेपुढे फार मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे असे अनिल दादा म्हणाले. या प्रसंगी बोलतांना जिल्हाप्रमुख ॲड.स्वप्नील गलधर म्हणाले की, मी भारतीय जनता पक्षात असताना अनेकदा अजित दादांच्या विरोधात आंदोलने केली. परंतु बीडचे पालकमंत्री झाल्यानंतर जेव्हा दादांच्या सहवासात जाण्याचा योग आला तेव्हा मात्र त्यांचे उत्तुंग व्यक्तीमत्व मला प्रभावित करुन गेले. बीड जिल्ह्यात महायुतीचा घटक म्हणून शिवसेनाला न्याय देण्याची भूमिका अजित दादांनी ठेवली होती. तशीच भुमिका भविष्यात उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनींनी ठेवावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या प्रसंगी मान्यवरांची समयोचित भाषणे झाली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नितीन क्षीरसागर यांनी तर आभार प्रदर्शन प्रतिक कांबळे यांनी केले.

# अकुशल मस्टर मंजुरीसाठी लाच घेतानी संदीप राऊत पकडला; जलसंधारण विभागाची दुसरी विकेट पडली

**जालना । प्रतिनिधी**

**तक्रारदार यांच्या वडीलांच्या नावे असलेल्या विहीरीचे बांधकाम पूर्ण झाल्याचे अकुशलचे मस्टर मंजुर करण्यासाठी १३००/-रू लाचेची मागणी करून सदर रक्कम स्विकारली असता संदीप राउत, वय ३० वर्ष पद- उपविभागिय जलसंधारण अधिकारी, (ल.पा.) विभाग, जिल्हा परीषद जालना यांना पकडण्यात आले. तसेच अंबड जलसंधारण विभागांमध्ये काही महिन्यापूर्वी उप अभियंता लाच घेताना पकडला होता आता या विभागाची ही दुसरी विकेट पडली. आरोपी संदीप सुखदेव राउत, वर्ग-१, मुळ रा. यावली ता. मोहोळ जि. सोलापुर ह.मु. घरटं निवास, सिडको एन-२ श्री. कुलकर्णी यांच्याकडे किरायाणे छत्रपती संभाजीनगर येथे राहत होता.**

तक्रारदार यांच्या वडीलांच्या नावे असलेल्या शेतीमध्ये पंचायत समिती जालना येथुन सन-२०२४ मध्ये ग्रामिण रोजगार हमी योजनेअंतर्गत विहिर मंजुर झाली असुन सदर विहीरीचे बांधकाम पूर्ण झाले आहे. सदर विहीरीचे अकुशलचे मस्टर मंजुर करण्यासाठी तक्रारदार यांनी यांचे कार्यालयात जावून भेट घेतली असता आलोसे यांनी तक्रारदाराकडे १३००/-रुपयांची मागणी केली आहे. अशा आशयाची तक्रार जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दि. ३०.०६.२०२६ रोजी तक्रार प्राप्त झाली होती. दिनाक ३०/०६/२०२६ रोजी उपविभागिय जलसंधारण अधिकारी, (ल.पा.) विभाग, जिल्हा परीषद जालना येथे पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता यातील लोकसेवक संदीप राउत, यांनी तक्रारदार यांच्या वडीलांच्या नावे असलेल्या विहीरीचे बांधकाम पुर्ण झाल्याचे अकुशलचे मस्टर मंजुर करण्यासाठी १३००/-रू लाचेची मागणी करून ती स्विकारण्याचे पंचासमक्ष कबुल केले त्यावरुन दि.३०.०६.२०२६ रोजी पंचासमक्ष सापळा कारवाई करण्यात आली.आजमावली असता आलोसे संदीप सुखदेव राउत, वय ३० वर्ष पद- उपविभागिय जलसंधारण अधिकारी, (ल.पा.) विभाग, जिल्हा परीषद जालना यांनी उपविभागिय जलसंधारण अधिकारी, (ल.पा.) विभाग, जिल्हा परीषद जालना येथे उपविभागिय जलसंधारण अधिकारी यांच्या कक्षात लाचेचे १३००/-रूपये तक्रारदार यांचेकडून घेउन टेबलच्या ड्राव्हर मध्ये ठेवले असता त्यांना लाचलुचपत प्रतिंधक विभाग जालना च्या पोलीस निरीक्षक कोमल शिंदे यांनी व त्यांच्या पथकातील अंमलदार यांनी ताब्यात घेतले.आलोसे यांची घरझडती प्रक्रिया सुरु आहे. आरोपी यांच्यावर पोलीस ठाणे कदीम जालना येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

# पान १ वरून...

## राज्यातील एनएचएम चे १५ हजार

आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर तसेच राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या समायोजनासाठी विशेष पाठपुरावा केला. त्यानुसार हा शासन निर्णय घेण्यात आला. यापूर्वी १४ मार्च २०२४ रोजी मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार १० वर्षांपेक्षा अधिक सेवा पूर्ण केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा समायोजनाचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर ४ नोव्हेंबर २०२५ रोजी या निर्णयात सुधारणा करण्यात आली. तसेच, या कर्मचाऱ्यांच्या समायोजनासाठी निकष निश्चित करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली आंतरविभागीय समितीची स्थापना करण्यात आली होती. या समितीच्या शिफारशी आणि २५ जून २०२६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णयानुसार आजचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. शासन निर्णयानुसार, २५ जून २०२६ या मंत्रिमंडळ बैठकीच्या दिनांकापर्यंत तांत्रिक खंड वगळून सलग १० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक कंत्राटी सेवा पूर्ण केलेल्या १४,०१० कर्मचाऱ्यांना एकवेळच्या विशेष बाब म्हणून समकक्ष वेतनश्रेणीतील अधिसंख्य पदांवर नियुक्ती देण्यात येणार आहे. यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग आणि ग्रामविकास विभागातील नियमित मंजूर पदांशी संबंधित कंत्राटी पदांची समकक्षता निश्चित करण्यात येणार असून, आवश्यकतेनुसार इतर विभागांतील समकक्ष पदांचाही विचार केला जाणार आहे.

--------------

## जुलैतही पावसाची

नव्हे, तर आगामी रब्बी हंगामालाही बसू शकतो. जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न, पिण्याच्या पाण्याची टंचाई आणि शेतीचा वाढता खर्च यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. दरम्यान, पॅसिफिक महासागरातील एल निनो सक्रिय झाल्याने त्याचा परिणाम मान्सूनवर होत असल्याचे हवामान तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे. सकारात्मक आयओडी स्थिती निर्माण झाल्यास पावसाला काहीसा आधार मिळू शकतो, मात्र सध्या तरी भारतीय हवामान विभागाने आयओडी तटस्थ राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. एकूणच, जूननंतर जुलै महिन्यातही पाऊस दडी मारण्याची शक्यता असल्याने राज्यातील शेती गंभीर संकटाच्या उंबरठ्यावर उभी आहे. आता सर्वांच्या नजरा आकाशाकडे लागल्या असून, वेळेत आणि समाधानकारक पाऊस झाला नाही तर यंदाचा खरीप हंगाम धोक्यात येण्याची भीती अधिक गडद झाली आहे. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने तातडीने दुष्काळपूर्व उपाययोजना, पीक संरक्षण आणि आर्थिक मदतीबाबत ठोस पावले उचलण्याची मागणीही जोर धरू लागली आहे.

--------------

## सचिन अहिर यांनी ठाकरेंची

झालेल्या पत्रकार परिषदेत एकनाथ शिंदे यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली. सचिन अहिर यांनी आज षटकार मारला. सहा खासदारांनी मागच्या आठवड्यात षटकार ठोकले. आता सहा मतदारसंघात काही लोकं जाऊन आले. त्यांचे सचिन अहिर यांनी षटकार मारुन स्वागत केले आहे. चौकार, षटकार सुरुच आहेत आणि एक एक समोरची विकेट धडाधड पडत राहील, असा टोला त्यांनी अप्रत्यक्षपणे ठाकरेंना लगावला. सचिन अहिर हे तीनवेळा विधानसभेचे आमदार होते. आता विधानपरिषदेचे आमदार आहेत. ते राज्यमंत्री होते. यावेळी माझ्यासारख्या कार्यकर्त्याला उपसभापती या पदावरती मान देऊन तळागाळातील कार्यकर्ता या पदापर्यंत जाऊ शकतो, हे दाखवून देण्याचे काम शिंदे यांनी केले आहे, अशी भावना सचिन अहिर यांनी व्यक्त केली.

------------

## राम मंदिरातील गैरव्यवहारावर

देणग्या, दागिने आणि इतर मौल्यवान वस्तू अर्पण केल्या जातात. मात्र, या सर्वांचा योग्य हिशेब ठेवला जात नसल्याचे आरोप समोर आले असून, या प्रकरणातील कथित गैरव्यवहाराबाबत केंद्र सरकारकडून कोणतीही ठोस भूमिका मांडली जात नसल्याचे त्यांनी नमूद केले. या प्रकरणावर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रातील वरिष्ठ नेत्यांनी अद्याप स्पष्ट भूमिका घेतलेली नसल्याचा दावा करत ठाकरे यांनी प्रश्न उपस्थित केला. राम मंदिराच्या उभारणीचे राजकीय श्रेय घेणाऱ्यांनी मंदिरातील कथित आर्थिक गैरव्यवहारावरही तितक्याच स्पष्टपणे बोलणे अपेक्षित असल्याचे त्यांनी म्हटले. राम मंदिर उभारणीसाठी देशभरातील लाखो रामभक्त, करसेवक, संत-महंत आणि सामान्य नागरिकांनी योगदान दिल्याची आठवण करून देत ठाकरे म्हणाले की, हे मंदिर कोणत्याही एका पक्षाचे किंवा संघटनेचे नसून संपूर्ण हिंदू समाजाच्या श्रद्धेचे प्रतीक आहे. भक्तांनी मंदिरात अर्पण केलेला प्रत्येक रुपया हा त्यांच्या कष्टाचा आणि श्रद्धेचा असतो. अनेक महिलांनी आपल्या स्त्रीधनातूनही दागिने अर्पण केले असतील. त्यामुळे या निधीच्या वापराबाबत संपूर्ण पारदर्शकता असणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. राज ठाकरे यांनी आरोप केला की, मंदिरांतील देणग्यांबाबत वेळोवेळी प्रश्न उपस्थित होत असतात. त्यामुळे संबंधित विश्वस्त, व्यवस्थापन आणि जबाबदार अधिकाऱ्यांची निष्पक्ष चौकशी करून सत्य जनतेसमोर आणणे गरजेचे आहे. श्रद्धेचा गैरवापर होऊ नये आणि भक्तांचा विश्वास कायम राहावा, यासाठी कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

------------

## रेल्वेचे इंटरलॉकिंगचे काम पुर्ण; लवकरच

विद्यूत जोडणी, रेल्वे रूळ अंथरणे, भुसंपादन अशा विविध विषयाचा आढावा घेतला.बीड ते परळी मार्गात काही ठिकाणी भुसंपादचे विषय असून त्याठिकाणच्या शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत, काही ठिकाणी विनाकारण कोणी रेल्वे कामात अडथळा आणत असेल तर त्याठिकाणी पोलीस बंदोबस्तात काम करावे, अशा सुचना दिल्या. दरम्यान, रेल्वे अधिकाऱ्यांनी दोन महिन्यात बीड ते परळी पर्यंतचे काम पुर्ण केले जाईल, असे सांगितले. तर बीड ते आष्टीपर्यंतचे इंटरलॉकिंगचे काम पुर्ण झाले असून त्याठिकाणी आता बीड-पुणे-मुंबई रेल्वे सुरू करण्याचा प्रयत्न आहे. पुण्यात एक ठिकाणी किरकोळ काम बाकी असून ते पंधरा दिवसात पुर्ण होईल, यानंतर बीडहून पहाटे ५ वाजता पुण्यासाठी रेल्वे सुरू करण्यात येईल, तर पुण्याहून सायंकाळी पाच वाजता बीडला रेल्वे येईल, याच पध्दतीने बीड-मुंबई रेल्वे देखील सुरू करण्यात येणार असून तीची वेळही दोन दिवसात ठरविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. याच बरोबर प्रलंबित धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर या प्रस्तावित रेल्वे मार्गांबाबत प्रशासकीय बाबी आणि पुढील कायदेशीर व तांत्रिक कार्यवाहीवर चर्चा करण्यात आली. बीड येथील बार्शी नाका परिसरातील रेल्वेस्थानकाबाबत आपण रेल्वे विभागाकडे पाठपुरावा करत असून तो प्रश्न मार्गी लागेल, असा विश्वासही खा.बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केला. बीड जिल्ह्यात शेतकऱ्यांना विद्यूत पुरवठा सुरळीत होत नसल्याची ओरड वाढत असून महावितरण कंपनीने जिल्ह्यात नव्याने रोहित्र, जनीत्र बसविण्यासाठी प्रस्ताव पाठवावेत, या कामात काही अडचणी आल्यास त्या सोडविण्यासाठी मी प्रयत्न करेल, असा शब्दही खा.बजरंग सोनवणे यांनी दिला. सकाळी ११ वाजता खा.बजरंग सोनवणे हे बीड जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात बैठकीसाठी आले होते. सायंकाळी ५ वाजेपर्यंत बैठका सुरू होत्या. जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने खा.बजरंग सोनवणे यांनी सलग सहा तास बैठका घेण्याचा एक रेकॉर्डच तयार केला आहे.

-------------

## एचएसआरपी नंबर प्लेट नसेल तर

मुदत संपली आहे. परिवहन विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार ३१ डिसेंबर २०१९ अखेर सुमारे १४ लाख ६७ हजार ७४२ वाहने नोंदणीकृत होती. या वाहनांना सुरक्षेच्या दृष्टीने एचएसआरपी नंबर प्लेट बसविणे बंधनकारक आहे. अधिकृत आकडेवारीनुसार, नोंदणीकृत वाहनांपैकी १० जून २०२६ पर्यंत केवळ ६ लाख २८ हजार ६२४ वाहन मालकांनी एचएसआरपी बसविण्यासाठी ऑनलाइन नोंदणी केली आहे. यामधील केवळ ५ लाख २६ हजार ७२० वाहनांवरच प्रत्यक्ष एचएसआरपी बसविण्यात आली आहे. सुमारे ८ लाख ३९ हजार वाहनांनी एचएसआरपीसाठी अद्याप नोंदणीच केली नाही. नोंदणी केलेल्या वाहनधारकांना अद्याप नबंर प्लेट बसवून घेतलेली नाही. अजूनही लाखो वाहने एचएसआरपी नंबरप्लेटविना रस्त्यावर धावत आहेत. अनेकदा मुदतीवाढ देऊनही निम्म्याहून अधिक वाहन चालकांनी ही प्रकिया पूर्ण केली नसल्याचे आकडेवारीवरुन निर्देशनास येत आहे.

--------------

## अवैध डान्स बार रोखण्यासाठी पोलीस

प्रथा यामुळे बंद होईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. ठाणे जिल्ह्यात ऑर्केस्ट्रा बार उशिरापर्यंत सुरू राहत असल्याबाबत सदस्य नानाभाऊ पटोले यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात डान्स बारवर अनेक निर्बंध असतानाही काही आस्थापनांकडून पोलीस कायद्यांतर्गत परफॉर्मिंग लायसन्स घेऊन प्रत्यक्षात डान्स बार चालविले जात आहेत. हा गैरप्रकार रोखण्यासाठी पोलीस कायद्यात दुरुस्ती करण्यात येत असून, त्यानंतर डान्स बार चालविणाऱ्या सर्व आस्थापनांना डान्स बार कायद्यांतील सर्व अटी व निर्बंधांचे पालन करणे बंधनकारक राहील. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर तसेच संबंधित दोषी पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येत आहे. वारंवार नियमभंग करणाऱ्या किंवा गुन्हे घडणाऱ्या आस्थापनांचा परवाना रद्द करण्याची तरतूद करण्याचा प्रस्ताव विधि व न्याय विभागाकडे पाठविण्यात आला आहे. यावेळी मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रूम) यामध्ये अश्लील नृत्यावर प्रतिबंध घालणे व त्यामध्ये काम करणाऱ्या महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण अधिनियम, २०१६ अंतर्गत ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत एकाही ध्वनिमुद्रित संगीतावरील नृत्य परवान्यास मंजुरी देण्यात आलेली नसल्याचे सांगितले. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ अंतर्गत सार्वजनिक मनोरंजन नियमावलीनुसार परवानाधारक ऑर्केस्ट्रा बार यांनी नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी जानेवारी २०२६ ते १२ जून २०२६ या कालावधीत एकूण १८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यापैकी नऊ प्रकरणांत न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून उर्वरित नऊ गुन्ह्यांचा तपास सुरू आहे. शेवटी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील ऑर्केस्ट्रा बार विहित वेळेत बंद होतात की नाही, यावर लक्ष ठेवण्यासाठी रात्रगस्त अधिकारी आणि प्रत्येक पोलीस ठाण्याचे बिट मार्शल नियमित तपासणी करतात. परवान्याच्या अटींचे उल्लंघन आढळल्यास संबंधित आस्थापनांविरुद्ध तातडीने कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

--------------

## ओलिस ठेवलेल्या महाराष्ट्रातील

तर देशातून तब्बल ७००-८०० तरुण म्यानमार - थायलंड सीमेवरील गोल्डन ट्रँगल नामक छळछावणीत ओलिस असून, त्यांना शारीरिक यातना देऊन त्याच्याकडून सायबर गुन्हे घडवले जात असल्याची तक्रार बीड सायबर पोलिसात दाखल करण्यात आलेली आहे, तसेच याप्रकरणी तपासाची चक्रे थेट देशाच्या गुप्तचर विभागापर्यंत पोचले असून, आपला बचाव व सुटका होण्यासाठी ही सर्व तरुण प्राणांची बाजी लावत असून सध्या ते मृत्यूच्या दाढेत असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी तातडीने लक्ष घालून केंद्र सरकार तसेच विदेश मंत्रालयाची मदत घेऊन या तरुणांच्या सुखरूप सुटकेसाठी प्रयत्न सुरू करावेत तसेच मोठ्या पगाराचे आश्वासन देऊन सोशल मीडियाच्या माध्यमातून जाळे विणून आंतरराष्ट्रीय स्तरावर मानवी तस्करी करणाऱ्या या टोळीतील महाराष्ट्रामध्ये सक्रिय असणाऱ्या एजंटांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी धनंजय मुंडे यांनी पत्राद्वारे केली आहे.

------------

## चक्क विद्यार्थ्याचा

घेण्यासाठी विद्यार्थ्याने हे खळबळजनक कृत्य केल्याचे समोर आले. यापुर्वी त्याचे वर्गशिक्षकांसोबत काही कारणावरून वाद झाले होते. मंगळवारी तो टीसी घेण्यासाठी शाळेत आला, तेव्हा पुन्हा एकदा त्याचा आणि संबंधित शिक्षकाचा वाद झाला. विद्यार्थ्याने आपल्याजवळील चाकू काढून शिक्षकांवर सपासप वार केले. अचानक घडलेल्या घटनेने शाळा परिसरात एकच खळबळ माजली. जखमी झालेल्या शिक्षकांना तात्काळ जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. पोलीस तपासादरम्यान एक अत्यंत धक्कादायक माहिती समोर आली आहे. या अल्पवयीन विद्यार्थ्याने शिक्षकावर हल्ला करण्यासाठी वापरलेला चाकू चक्क एका ऑनलाईन शॉपिंग साईटवरून खरेदी केला होता, अशी माहिती तपासात समोर आली आहे. यावरून विद्यार्थ्याने हा हल्ला पूर्वनियोजित कट रचून केल्याचा संशय व्यक्त होत आहे. पोलीस या प्रकरणी पुढील तपास करत आहेत.

-----------

## आरक्षणाच्या उपवर्गीकरणावरून

अध्यक्षतेखालील समितीने आरक्षणाच्या उपवर्गीकरणाचा अहवाल शासनाला सादर केला आहे. हा अहवाल जाहीर करण्याची मागणी काही सदस्यांनी मुख्यमंत्र्यांना भेटून केली आहे. दलित बांधवांनी काढलेल्या महामोर्चाचे पडसादही विधानसभेत उमटले. सभागृहात मुख्यमंत्र्यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार शेड्युलर कास्टमध्ये मागे राहिलेल्या जातींना न्याय मिळावा म्हणून हा प्रयत्न आहे. याकरिता बदर कमिटीचा रिपोर्ट आला आहे. मंत्रिमंडळ बैठकीत त्यावर चर्चा झाली असून, हरकती आणि सूचना मागविण्यात येत आहेत. त्यावर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली कमिटी नेमून आलेल्या हरकती आणि सूचनांवर सुनावणी होईल. अजूनपर्यंत तरी असा कोणताही कायदा अस्तित्वात आलेला नाही. मात्र सर्वांना विश्वासात घेऊन सर्वांच्या सहमतीने आणि विधिमंडळ सदस्यांशी चर्चा करूनच याबाबत निर्णय घेतला जाईल. कर्नाटक आणि तेलंगणामध्ये हा कायदा झाला आहे. महाराष्ट्रमध्ये कोणत्याही घटकावर अन्याय होणार नाही याची काळजी घेतली जाईल. सभागृहात केवळ गृहीतकांच्या आधारे जी चर्चा सुरू आहे त्याला काही अर्थ नाही अशी स्पष्ट भूमिका मुख्यमंत्र्यांनी मांडली. मात्र विरोधकांनी आपला गोंधळ सुरूच ठेवला.

-------------

cmyk

cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार, दि. ०१ जुलै २०२६



## थोडक्यात

### अंबाजोगाई आरटिओ कडून एम एच ४४ एके ही नवीन वाहन नोंदणी मालिका सुरू

अंबाजोगाई । प्रतिनिधी

उपप्रादेशिक कार्यालय अंबाजोगाई-मोटरसायकल नवीन नोंदणी साठीची एम एच ४४ मालिका चलूहित असून दि ३० जून २६ आणि ०२ जुलै २७ डिमांड ड्राफ्ट स्वीकारण्याची वेळ ११ :०० ते ५.३० कार्यालयीन कामकाजच्या दिवशी राहील. दि २ जुलै २६ रोजी सकाळी१२ वाजता यादी जाहीर कर्ली जाईल यामध्ये एकाच नंबरचे २ किंवा त्यापेक्षा जास्त अर्ज असतील तर ते सोडून इतरांना दुपारी २.३० पर्यंत भरणा करता येईल. त्या नन्तर भरणा घेतला जाणार नाही. दि ०३ जुलै २६ रोजी एकाच नम्बरसाठी आलेल्या अर्जदारांनी दुपारी ३ वाजेपर्यंत डिमांड ड्राफ्ट सादर करावेत यामध्ये जे जास्तीचे पैसे भरणार आहेत त्यांना आकर्षक नंबर देण्यात येईल असे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय यांच्या कडून कळवण्यात आले आहे.

### जोशीज् मॅथ्स क्लासेसमध्ये विद्यार्थ्यांचे कौतुकायन



बीड । प्रतिनिधी

जोशीज् मॅथ्स क्लासेस, उमाकिरण एज्युकेशनल संकुल, आदर्श नगर, बीड येथे आयोजित कौतुकायन २०२६, गौरव समारंभ आणि प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन सेमिनार हे तीनही कार्यक्रम विद्यार्थी, पालक, मान्यवर आणि नागरिकांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन करून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्रा. सुनील जोशी यांनी प्रास्ताविकातून विद्यार्थ्यांच्या यशामागील सातत्यपूर्ण मेहनत, योग्य मार्गदर्शन आणि पालकांच्या सहकार्याचे महत्त्व अधोरेखित केले.

दक्षिण आफ्रिकेत पार पडलेल्या जगप्रसिद्ध कॉम्रेड्स मॅरेथॉन (८७ कि.मी.) स्पर्धा यशस्वीरीत्या पूर्ण करून बीड जिल्ह्याचा आणि देशाचा गौरव वाढविणाऱ्या सात धावपटूंचा विशेष सत्कार करण्यात आला. यामध्ये श्री शरद खिल्लारे सर,मेजर प्रभाकर जाधव सर, श्री कल्याण कुलकर्णी सर, श्री हरी ठोंबरे सर, डॉ. अमोल मोराळे सर या सर्वांनी विद्यार्थ्यांना जिद्द, शिस्त, सातत्य आणि ध्येयपूर्तीचा प्रेरणादायी संदेश दिला. जेईई मेन, जेईई ॲडव्हान्स्ड, एमएचटी-सीईटी, महाराष्ट्र राज्य मंडळ (एचएससी), व्हीआयटीईई तसेच इतर स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचाही गौरव करण्यात आला. विशेषतः २०२६ मध्ये विविध परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या मोहम्मद अस्लम, प्रशांत लोणकर, प्रतिक कंठक, श्रीकांत खराडे, जयदीप जानवळे, धसे रुग्वेद, मयुरेश जोशी, धनंजय माने, अभिषेक आमटे, करण कांगडे, वैभवी थिगळे, अंकिता काळे, धस आदित्य, अमर कदम, जिशान पटेल, कृपा मंत्री, अभिनव वाघमारे, आदिती शिंदे, यश सौंदलकर, सुमित सोनवणे, तन्मय बोंडगे, शेख शाद, संस्कार काजळे, वैष्णवी कोल्हे, शरयू गिरे, सांची कांबळे, सचिन जगदाळे,प्राप्ती खरात, सुमित सोनवणे, पूनम गावडे, प्रतिक पवार, मिर्झा अफीफ मन्सूर, सचिन जगदाळे, नवनाथ डिसले, ओंकार शेजूळ आणि महेश डिसले यांचा पालकांसह विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास रोटरी क्लब ऑफ बीडचे अध्यक्ष रो. विकास उमापूरकर, सचिव रो. सुमित जयस्वाल, निर्वाचित अध्यक्ष रो. सीए श्रीगोपाल लड्ढा आणि निर्वाचित सचिव रो. सुहास बेदरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. सुनील जोशी यांनी उपस्थित सर्व मान्यवर, विद्यार्थी, पालक व सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले. योग्य मार्गदर्शन, कठोर परिश्रम आणि सातत्य यांच्या बळावर प्रत्येक विद्यार्थी आपल्या स्वप्नातील करिअर निश्चित घडवू शकतो, असा विश्वास प्रा. सुनील जोशी यांनी व्यक्त केला.

# अखेर कामखेडा-कांबी शिवरस्ता झाला खुला

## तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश



बीड । प्रतिनिधी

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्ह्यातील प्रलंबित शेतरस्त्यांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्याचे दिलेले स्पष्ट निर्देश आणि शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या भूमिकेनुसार महसूल प्रशासनाने आणखी एक महत्त्वपूर्ण यश संपादन केले आहे . बीड तालुक्यातील कामखेडा - कांबी या दोन गावांना जोडणारा पंचवीस वर्षांहून अधिक काळ विविध कारणांमुळे रखडलेला शिवरस्ता अखेर सर्वांसाठी खुला करण्यात आला . अनेक वर्षांपासून न्यायालयीन प्रक्रिया , स्थानिक वाद आणि काही जमीनधारकांच्या आक्षेपांमुळे हा प्रश्न प्रलंबित होता . मात्र जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या विशेष लक्षाखाली महसूल प्रशासनाने सातत्यपूर्ण पाठपुरावा करून हा प्रश्न मार्गी लावला . त्यामुळे दोन्ही गावांतील शेतकरी , विद्यार्थी , ज्येष्ठ नागरिक , महिला आणि सर्वसामान्य ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत प्रशासनाचे आभार मानले आहेत.

या संपूर्ण प्रक्रियेस जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे मार्गदर्शन लाभले . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या समन्वयातून बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी या प्रश्नात स्वतः विशेष लक्ष घालून अनेक वेळा प्रत्यक्ष घटनास्थळी भेट दिली . त्यांनी संबंधित जमीनधारक , शेतकरी आणि ग्रामस्थांशी संवाद साधत कायदेशीर तरतुदी समजावून सांगितल्या . महसूल अभिलेख , गाव नकाशे , जुने रेकॉर्ड आणि न्यायालयीन बाबींचा सखोल अभ्यास करून सर्व संबंधितांना विश्वासात घेण्यात आले . संवाद, संयम आणि लोकसहभागाच्या माध्यमातून अनेक वर्षे प्रलंबित असलेला हा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्यात प्रशासनाला यश आले. रस्ता सुरू झाल्यामुळे आता शेतकऱ्यांना ट्रॅक्टर , हार्वेस्टर , कृषी अवजारे , बियाणे , खते आणि शेतीमालाची वाहतूक सहज करता येणार आहे . विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी सुरक्षित मार्ग उपलब्ध झाला असून नागरिकांना आरोग्य केंद्र , पशुवैद्यकीय दवाखाना , बाजारपेठ आणि विविध शासकीय कार्यालयांपर्यंत पोहोचणे अधिक सुलभ झाले आहे . विशेष म्हणजे आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका आणि इतर शासकीय सेवा वेळेत उपलब्ध होणार असल्याने ग्रामीण भागातील नागरिकांच्या जीवनमानात मोठी सुधारणा होणार आहे. महसूल प्रशासनाने स्पष्ट केले की , जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील प्रलंबित शेतरस्त्यांचे प्रश्न टप्प्याटप्प्याने मार्गी लावण्याची मोहीम सुरू असून शेतकरी हिताशी संबंधित प्रत्येक प्रश्नाला सर्वोच्च प्राधान्य दिले जात आहे . लोकसहभाग , कायद्याचे काटेकोर पालन, पारदर्शकता आणि सकारात्मक संवाद यांच्या माध्यमातून अनेक वर्षांपासून अशक्य वाटणारे प्रश्नही सोडविण्यात येत आहेत . कामखेडा - कांबी शिवरस्ता हा ग्रामीण भागातील लोकाभिमुख, संवेदनशील आणि परिणामकारक प्रशासनाचा आदर्श ठरला असून भविष्यात अशाच अनेक प्रलंबित प्रश्नांच्या निराकरणासाठी हा उपक्रम प्रेरणादायी ठरणार आहे.

## चांगल्याला चांगले म्हणण्याचे धाडस माणसात असायला हवे -तहसीलदार घोळवे

शिरूर । प्रतिनिधी

राजकारण, प्रशासन व इतर व्यावसायिक क्षेत्रात अनेक चांगले लोक कार्य करीत असतात. मात्र या लोकांच्या चांगल्या कार्याचा समाजाकडून उल्लेख केला जात नाही. चांगल्या कार्याला चांगले म्हणण्याचे धाडस समाजाने न दाखवल्याने विविध क्षेत्रात चांगले कार्य करणारे लोक समाजाकडून दुर्लक्षित होत आहेत. यांचे पाठबळ वाढवण्यासाठी चांगल्या कार्याला चांगले म्हणण्याचे धाडस समाजाने दाखवले पाहिजे प्रखर मत शिरूर कासारचे तहसीलदार सुरेश घोळवे यांनी फुलसांगवी येथे व्यक्त केले आहे.

शिरूर कासार तालुक्यातील फुलसांगवी येथील जि. प. केंद्र माध्यमिक शाळेच्या प्राथमिक पदवीधर शिक्षिका श्रीमती शिला विठ्ठलराव सोनवणे यांचा आज सेवापुर्ती सन्मान सोहळा फुलसांगवी येथील श्री.संत वामनभाऊ महाराज मंदिरामध्ये पार पडला आहे. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून गेवराईचे गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप यांची उपस्थिती लाभली होती तर कार्यक्रमाचे विशेष अतिथी म्हणून श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचे मठाधिपती महंत जनार्दन महाराज, शिरूरचे तहसीलदार सुरेश घोळवे,



गटविकास अधिकारी भरत नागरे, जि.प. सदस्य रामराव खेडकर, सरपंच भास्कर सानप, माजी जि. प. सदस्य मोहनराव ढाकणे, आश्रुबा खरमाटे, ज्ञानसागर करिअर इन्स्टिट्यूट चे संचालक शाहिनाथ काजळे सर ट्रस्ट समिती अध्यक्ष रमेश तळेकर, सचिव विष्णू सोनवणे, श्रीमंत ढाकणे शरद ढाकणे सतीश खाडे, श्रीमती गंगाखेडकर मॅडम शालेय,अक्षय महाराज तळेकर लोणकेसर आदी मान्यवरांची उपस्थिती होती. पुढे बोलताना तहसीलदार घोळवे म्हणाले की, शालेय व महाविद्यालयीन जीवन जगणाऱ्या विद्यार्थ्यांनी तुकाराम मुंडे साहेबांना सारख्या अधिकाऱ्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपले व्यक्तिमत्व अभ्यासू व पारदर्शक बनविणे ही काळाची गरज आहे, असा सल्ला यावेळी तहसीलदार सुरेश घोळवे यांनी कार्यक्रमाच्या माध्यमातून समाजाला दिला आहे.

**मान्यवरांच्या प्रेमाने शिलाताई भारवल्या**

शिलाताई सोनवणे यांचा आज सेवापुर्ती सन्मान सोहळा असल्याने या सोहळ्याला प्रशासकीय अधिकाऱ्यांसह, धार्मिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आदी क्षेत्रातील मान्यवरांसह विद्यार्थी,पालक, शेतकरी वर्गाने मोठ्या संख्येने उपस्थिती लावून शिला लाताई सोनवणे यांच्या वरती शुभेच्छांचा वर्षाव केला आहे मान्यवरांच्या व गावकऱ्यांच्या या प्रेमाने शिलाताई सोनवणे सह संपूर्ण सोनवणे व खाडे परिवार भारावून गेला आहे.

## पान ६ वरून...

### माजलगाव मधील खुनाचा

त्यावरून पोलिसांनी आदित्य बारवाळ याला ताब्यात घेऊन चौकशी केली.चौकशी दरम्यान आरोपी आदित्य बारवाळ याने गुन्ह्याची कबुली दिली. मृत विकास वाघमोडे याने यापूर्वी आरोपीला मारहाण केली होती आणि जिवे मारण्याची धमकी दिली होती. याच रागातून २८ जूनच्या रात्री ११ वाजण्याच्या सुमारास, विकास शेताकडे जात असताना त्याचा पाठलाग करून, त्याला अडवले आणि चाकूसह वार करून हत्या केल्याचे आरोपीने सांगितले.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि पोलीस उपअधीक्षक ऋषीकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, माजलगाव ग्रामीणचे प्रभारी पोलीस निरीक्षक विजयकुमार रामोड, पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने आणि त्यांच्या पथकाने (पोलीस कर्मचारी बप्पासाहेब घोडके, महेश जोगदंड, जफर पठाण, दिलीप गित्ते, गणेश मराडे) यशस्वीरित्या पार पाडली.

### अवैध वाळू वाहतुकीचा

आणि आरोपींना ताब्यात घेतले. या गुन्ह्याचा पुढील तपास पोह/२२३ कल्याण राठोड करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके आणि पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि अतुलकुमार लांडगे, सपोनि समाधान दौड, तसेच पोलीस कर्मचारी अशोक हंबर्डे, कल्याण राठोड, गोरक्ष डोके, धिरज खांडेकर, विनोद कुटे, नारायण सदवदे आणि राजेंद्र चोरमले यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

### सततचा जाच असह्य

करत नसल्याचा बनाव रचत नातेवाईकांच्या मदतीने त्यांना रात्रीच शासकीय रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी शरीफ यांना मृत घोषित केल्यानंतर हा नैसर्गिक मृत्यू भासवण्याचा नसरीन यांचा प्रयत्न होता.मात्र, अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मुरलीधर खोकले यांनी मृतदेह पाहताच त्यांच्या तीक्ष्ण नजरेतून मृतदेहाच्या गळ्याभोवती असलेले काळसर व्रण आणि अंगावरील ओरखडे सुटले नाहीत. संशय आल्याने त्यांनी नसरीन यांची कसून चौकशी केली असता, तिने गुन्ह्याची कबुली दिली. त्यानंतर शवविच्छेदन अहवालातही गळा आवळल्यानेच मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी मृत शरीफ यांचा २४ वर्षीय मुलगा साहील शरीफ पठाण याने दिलेल्या फिर्यादीवरून अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात आरोपी आई नसरीन शरीफ पठाण हिच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ च्या कलम १०३ आणि ११५(२) अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या खळबळजनक प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संतोष जाधवर हे करत आहेत.

### आष्टी-पाटोदा-शिरूर मतदार

अतिरिक्त ३ वर्गखोल्यांची आवश्यकता आहे. यासाठी ४ कोटी ८ लाख रुपये तसेच १८ वर्गखोल्यांच्या दुरुस्तीसाठी ४६ लाख रुपये अशा एकूण ४ कोटी ८७ लाख रुपयांच्या निधीची गरज असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.पाटोदा तालुक्यातील १७८ जिल्हा परिषद शाळांपैकी मोडकळीस आलेल्या ११ शाळांमधील १९ वर्गखोल्या व विद्यार्थी संख्या वाढल्याने ११ शाळांमध्ये ११ अतिरिक्त वर्गखोल्यांचे बांधकाम आवश्यक आहे. यासाठी ३ कोटी ६० लाख रुपये तसेच २३ वर्गखोल्यांच्या दुरुस्तीसाठी ७७ लाख ५० हजार रुपये, असा एकूण ४ कोटी ३७ लाख रुपयांचा निधी आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे.तर शिरूर तालुक्यातील १८९ शाळांपैकी ५ शाळा इमारतविरहित असून, १८ शाळांमधील २९ वर्गखोल्या मोडकळीस आलेल्या आहेत. तसेच ३ शाळांमध्ये अतिरिक्त वर्गखोल्यांची आवश्यकता आहे. यासाठी ४ कोटी ४४ लाख रुपये व १८ वर्गखोल्यांच्या दुरुस्तीसाठी ४६ लाख रुपये, असा एकूण ४ कोटी ९० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सुरक्षित व दर्जेदार शैक्षणिक सुविधा मिळण्यासाठी जिल्हा वार्षिक नियोजन समितीच्या निधीतून या कामांना प्राधान्याने मंजुरी द्यावी, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.

### नियमांचे उल्लंघन करणाऱ्या

तपासणी, फिटनेस प्रमाणपत्र आणि विमा यांसारख्या आवश्यक कागदपत्रांची पूर्तता शाळा प्रशासनाने करावी.पालकांनीही आपल्या पाल्यांना केवळ पडताळणी पूर्ण झालेल्या सुरक्षित वाहनांतूनच शाळेत पाठवावे, असे आवाहन करण्यात आले आहे. नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनांवर पोलीस विभागामार्फत कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा अप्पर पोलीस अधीक्षक. समीर शेख यांनी दिला. मुख्य शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील यांनी, शाळा प्रशासन, दामिनी पथक आणि स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांनी समन्वयासाठी व्हॉट्सप ग्रुप तयार करून माहितीची देवाणघेवाण करावी, अशा सूचना दिल्या. तसेच, येत्या काळात 'कॉपीमुक्त अभियान' प्रभावीपणे राबवण्यासाठी शाळांनी पालकांशी संवाद साधून जनजागृती करावी आणि परीक्षेत पारदर्शकता व शिस्त राखण्यासाठी तयारी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

## रोटरी क्लब ऑफ माजलगाव सेंट्रलच्या अध्यक्षपदी रो.प्रभाकर शेटे व सचिवपदी रो.अंकुश राठोड





माजलगाव । प्रतिनिधी

रोटरी इंटरनॅशनल या जागतिक स्तरावर सामाजिक शैक्षणिक व आरोग्य क्षेत्रात मोठे कार्य असलेल्या संघटनेच्या सन २०२६-२७ या नूतन वर्षासाठी रोटरी क्लब ऑफ माजलगाव सेंट्रल च्या अध्यक्षपदी रो.प्रभाकर शेटे व सचिव पदावर रो.अंकुश राठोड तसेच जॉईंट सेक्रेटरी पदी इंजि. रो.कृष्णा सोळंके यांची रीतसर निवड झाली आहे.नूतन अध्यक्ष प्रभाकर शेटे यांची शहरात पर्यावरणरक्षण व जलजागृती मध्ये केलेले उल्लेखनीय कार्य म्हणून वेगळी ओळख आहे.

सन २०१६ मध्ये माजलगाव शहरात रोटरी क्लब ऑफ माजलगाव सेंट्रलच्या स्थापनेला रोटरी इंटरनॅशनल कडून अधिकृत मान्यता मिळाली तेव्हा पासून रोटरी क्लब च्या माध्यमातून शहरात सामाजिक कार्यात रोटरी माजलगाव सेंट्रलने अनेक समाजोपयोगी प्रकल्प राबवले त्यात आरोग्य तपासणी शिबीर, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर, रक्तदान शिबीर तसेच शैक्षणिक क्षेत्रात विज्ञान शिबीर जि.प.शाळेला डिजिटल क्लास रूम साठी टीव्ही सेट त्याच बरोबर मागील ११ वर्षात शहरात तालुक्यात पर्यावरण रक्षणात मोठया प्रमाणात वृक्षारोपण करण्यात आले, मागील दोन वर्षात रोटरी क्लब माजलगाव सेंट्रल ने हरित माजलगाव प्रकल्प अंतर्गत शहराच्या मुख्य रस्त्यावर वृक्षारोपण करण्यात आले जे माजलगाव करासाठी लक्षवेधी ठरले.रोटरीच्या या नूतन वर्षात ०१ जुलै २०२६ पासून ते ३० जून २०२७ पर्यंत च्या कार्यकाळासाठी नवीन समित्याच्या निवडी झाल्या आहेत.यात अनेक सामाजिक व आरोग्यदायी प्रकल्प राबवण्याचा संकल्प डिस्ट्रिक्ट ३१३२ चे उपप्रांतपाल रो. नितीन गोपन यांच्या मार्गदर्शनात दि ३० जुन मंगळवार रोजी झालेल्या क्लब असेम्बलीत नूतन अध्यक्ष रो.प्रभाकर शेटे व सचिव रो.अंकुश राठोड यांनी जाहीर केला.

## महेश इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग आष्टी येथे ४ जुलै रोजी भव्य कॅम्पस रिक्रूटमेंट ड्राईव्ह

आष्टी । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगार तरुण आणि तांत्रिक शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी नोकरीची मोठी सुवर्णसंधी निर्माण झाली आहे. शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे महेश इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, आष्टी आणि आनंद चॅरिटेबल ट्रस्टचे डिप्लोमा इन इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, आष्टी यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. ४ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये भव्य कॅम्पस रिक्रूटमेंट ड्राईव्ह २०२६ (रोजगार मेळावा) चे आयोजन करण्यात आले आहे.

या भव्य रोजगार मेळाव्यात देश- विदेशातील ३० पेक्षा अधिक नामांकित कंपन्या सहभागी होणार असून,विविध क्षेत्रांतील गुणवंत उमेदवारांची थेट मुलाखतींद्वारे निवड केली जाणार आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नामांकित उद्योगांमध्ये करिअर घडवण्याची संधी मिळणार असून स्थानिक स्तरावर रोजगार निर्मितीला मोठी चालना मिळणार आहे. या कॅम्पस ड्राईव्हमध्ये बी.ई. बी.टेक.पदवीधर, डिप्लोमा अभियंते, बीसीएस बीसीए बी.एस्सी. तसेच संबंधित शाखांतील पात्र उमेदवार सहभागी होऊ शकतात. यामध्ये प्रामुख्याने:

माहिती तंत्रज्ञान

उत्पादन ऑटोमोबाईल

इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिकल, सिव्हिल आणि बांधकाम क्षेत्र, एआय अँड डेटा सायन्स सेवा उद्योग यांसह इतर विविध क्षेत्रांतील कंपन्या भरती प्रक्रिया राबविणार आहेत.

**अशी असेल निवड प्रक्रिया:**

कंपन्यांच्या गरजेनुसार भरती प्रक्रियेमध्ये लेखी परीक्षा,तांत्रिक मुलाखत एचआर मुलाखत आणि कौशल्य चाचणी आदी टप्प्यांचा समावेश असू शकतो. अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना त्यांच्या पात्रतेनुसार आकर्षक वेतन व इतर भत्ते देऊन करिअरची उत्तम संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे.सहभागी होणाऱ्या उमेदवारांनी येताना आपला अद्ययावत बायोडाटा पासपोर्ट आकाराचे फोटो, ओळखीचा पुरावा, सर्व शैक्षणिक गुणपत्रिका महाविद्यालयाचे ओळखपत्र व आवश्यक कागदपत्रांच्या मूळ व छायांकित प्रतींसह उपस्थित राहावे. इच्छुक उमेदवारांनी नाव नोंदणीसाठी प्रा. डोणे एल.एस.(मो. ९६०४२०९०४२) यांच्याशी संपर्क साधून ऑनलाइन नोंदणी करावी. तसेच इच्छुक कंपन्यांनाही उमेदवारांच्या गुणवत्तेनुसार थेट कॅम्पस मुलाखती घेण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

## मतदार यादी शुद्धीकरणासाठी एसआयआर प्रक्रियेबाबत धारूर तहसील कार्यालयात मार्गदर्शन बैठक

किल्ले धारूर । प्रतिनिधी

मतदार यादी अधिक अचूक व अद्ययावत करण्यासाठी निवडणूक विभागाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या डखठ (डशिलळरश्र खपींशपीळींश ठशींळीळेप - विशेष सखोल पुनरिक्षण) प्रक्रियेबाबत २९ जून रोजी धारूर तहसील कार्यालयात महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती.या बैठकीस माजलगाव उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले, तहसीलदार श्रीकांत निळे, तहसीलदार सुरेश पाळवदे, गटशिक्षणाधिकारी दत्तात्रय कोकणे नगरपरिषदेचे जबाबदार कर्मचारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांनी डखठ प्रक्रियेची सविस्तर माहिती देत मतदार यादीतील प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव अचूक राहण्यासाठी ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले.डखठ प्रक्रियेमध्ये प्रत्येक मतदाराकडून पडताळणीसाठी दोन फॉर्म भरून घेतले जाणार आहेत. त्यापैकी एक फॉर्म संबंधित मतदाराकडे नोंद म्हणून ठेवण्यात येणार असून दुसरा फॉर्म निवडणूक विभागाकडे जमा केला जाणार आहे. या प्रक्रियेतून मतदारांची माहिती, पात्रता आणि मतदार यादीतील नोंदींची पडताळणी केली जाणार आहे.नागरिकांनी डी एल ओ यांच्याकडे वेळेत फॉर्म भरून न दिल्यास मतदार यादीतील नावाबाबत अडचणी निर्माण होऊ शकतात.अशा परिस्थितीत नाव पुन्हा समाविष्ट करण्यासाठी तहसीलदार यांच्यासमोर सुनावणी प्रक्रियेला सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे नागरिकांनी स्वतःहून पुढाकार घेत निवडणूक विभागाच्या या मतदार यादी दुरुस्ती





### पोलीस पाटलांच्या कामाचे एसडीओ इंगोले यांनी केले कौतुक

प्रक्रियेत राष्ट्रीय कर्तव्य म्हणून सहभागी व्हावे, असे आवाहन गौरव इंगोले यांनी केले. प्रत्येक बूथ नुसार असलेले बीएलओ त्यांच्या सहाय्यक यांच्यासह मतदारांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन सदरील फॉर्म भरून घेणार आहेत. नागरिकांनी फोटो आणि बीएलओ यांनी मागितलेले पुरावे देऊन आपले नाव मतदार यादीत नव्याने समाविष्ट करून घ्यावे.

दरम्यान, मतदार मॅपिंग प्रक्रियेत ग्रामस्तरावर नवनियुक्त पोलीस पाटलांचे मोठे सहकार्य मिळाले असल्याचे यावेळी गौरव इंगोले यांनी सांगितले. पोलीस पाटलांनी गावपातळीवर नागरिकांशी समन्वय साधत केलेल्या सहकार्यामुळे ग्रामीण भागातील मतदार मॅपिंगची प्रक्रिया ९० ते ९५ टक्के पूर्ण झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.या उल्लेखनीय सहकार्याबद्दल उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांनी पोलीस पाटलांचे विशेष अभिनंदन केले. प्रशासन आणि ग्रामस्तरावरील यंत्रणा यांच्या समन्वयातूनच ही महत्त्वाची प्रक्रिया यशस्वी होत असल्याचे त्यांनी सांगितले. बैठकीस डखठ प्रक्रियेसाठी नियुक्त म्हणून काम करणारे शिक्षक, ग्रामविकास अधिकारी, त्यांना सहाय्य करणारे तलाठी, पोलीस पाटील तसेच कृषी सहाय्यक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मतदार यादीतील प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव कायम राहावे आणि अपात्र नावे वगळून पारदर्शक मतदार यादी तयार व्हावी, हा डखठ प्रक्रियेचा मुख्य उद्देश असल्याचे यावेळी गौरव इंगोले यांनी स्पष्ट केले. एक महिन्यात ही प्रक्रिया पूर्ण करून घेण्याच्या सूचना त्यांनी बैठकीत दिल्या.

उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले हे धारूर तहसील येथे आल्यानंतर नवनियुक्त पोलीस पाटलांनी माजलगाव उपविभागात पारदर्शक पद्धतीने पार पडलेल्या पोलीस पाटील भरती प्रक्रियेबद्दल समाधान व्यक्त केले. पात्र उच्चशिक्षित उमेदवारांना ग्रामस्तरावर पोलीस पाटील म्हणून जबाबदारी मिळवून देण्यात गौरव इंगोले यांची महत्त्वपूर्ण भूमिका राहिल्याबद्दल नवनियुक्त पोलीस पाटलांच्या वतीने गौरव इंगोले यांचा तहसीलदार श्रीकांत निळे यांच्या समवेत सत्कार करण्यात आला. यावेळी पोलीस पाटील संघटनेचे तालुकाध्यक्ष सचिन थोरात, सचिन कवडे, बालासाहेब शिंदे, प्रकाश साळवे, उमेश बडे, महादेव रिड्डे यांच्यासह पोलीस पाटील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/३१०

कार्यालय नगर परिषद, अंबड

दिनांक - १८-०५-२०२६

**नांव बदलण्याचा जाहीरनामा**

अर्जदार श्री सौ.श्रीमती १) मिर्झा अहेमदबेग कादर बेग २) मिर्झा आयशा बेग अहेमदबेग

प्रकरण : सिटी सर्वे नंबर १४३४ न.प.घर नं.९-१२९ चे हस्तांतरण करणे बाबत

सर्व जनतेस या जाहीरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र.९-१२९ दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे जागेचे नाव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास याबद्दल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

चतु:सिमा

पूर्व : सरकारी रस्ता, पश्चिम-सरकारी रस्ता

दक्षिण-अकबर पोलीस यांचे घर, उत्तर-हसन यांचे घर

**स्वाक्षरित/-**

**मुख्याधिकारी**

**नगर परिषद, अंबड**

# कापूस क्रांती अभियानातील अनुदानित बियाण्यांची विक्री

दिल्ली । प्रतिनिधी

केंद्र शासनाच्या सहकार्याने यंदा देशातील विविध राज्यांत कापूस उत्पादकता वाढविण्याच्या उद्देशाने कापूस क्रांती अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत निवड झालेल्या शेतकरी गटांना अनुदानित कपाशी बियाण्यांचे वितरण करण्यात आले आहे. मात्र, काही लाभार्थी शेतकरी ही बियाण्यांची पाकिटे स्वतः लागवडीसाठी न वापरता विक्री करत असल्याची चर्चा पुढे येत आहे. या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने संबंधित अधिकाऱ्यांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.

या अभियानात प्रत्येक शेतकरी गटात २५ सदस्यांचा समावेश असून प्रत्येक सदस्याला सहा बियाण्यांची पाकिटे देण्यात आली आहेत. त्यानुसार एका गटाला एकूण १५० पाकिटांचे वितरण करण्यात आले आहे. काही गटांमध्ये एकाच कुटुंबातील सदस्यांची संख्या अधिक असल्याने त्यांना मोठ्या प्रमाणात बियाण्यांची पाकिटे मिळाली आहेत. त्यापैकी काही पाकिटे पुन्हा कृषी सेवा केंद्रांकडे विक्रीसाठी दिल्याची चर्चा सुरू आहे.



कृषी विभागातील सूत्रांच्या माहितीनुसार, अभियानांतर्गत वितरित करण्यात आलेल्या काही कंपन्यांची बियाण्यांची पाकिटे सुमारे ५०० रुपये प्रति पाकीट या दराने विकली जात असल्याचे बोलले जात आहे. प्रामुख्याने अकोला, बाळापूर आणि मूर्तिजापूर तालुक्यांत अशा प्रकारची चर्चा असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, याबाबत अधिकृतरीत्या कोणतीही कारवाई अथवा प्रकरण नोंदविण्यात आल्याची माहिती उपलब्ध झालेली नाही. दरम्यान, शासनाच्या अनुदानातून मिळालेल्या बियाण्यांची विक्री करणे नियमबाह्य असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. अभियानांतर्गत प्रात्यक्षिके शंभर टक्के राबविण्याची जबाबदारी संबंधित तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी आणि क्षेत्रीय कर्मचाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. लाभार्थ्यांकडून प्रत्यक्ष लागवड होत असल्याची खात्री करावी, अनधिकृत विक्री आढळल्यास आवश्यक कारवाई करावी आणि अशा प्रकारांना आळा घालावा, अशा सूचना कृषी विभागाने दिल्या आहेत. यासंदर्भातील संदेश समाजमाध्यमांवरही प्रसारित होत आहे.

## शेळीची कोकण कन्याळ जात; शेळीपालनासाठी उत्तम पर्याय !

सध्या शेळीपालन व्यवसाय हा मोठ्या प्रमाणावर केला जात असून, राज्यातील अनेक सुशिक्षित बेरोजगारांसाठी एक आर्थिक संधी म्हणून शेळीपालन व्यवसाय समोर आला आहे. कमी खर्चात व कमी जागेत चांगला नफा हा शेळीपालन व्यवसायाच्या माध्यमातून मिळणे शक्य आहे. मात्र, त्यासाठी गरज आहे ती व्यवस्थित नियोजनाची आणि शेळीपालनासाठी योग्य जातींची निवड या गोष्टींची होय. शेळ्यांच्या विविध प्रकारच्या प्रजाती भारतात आहेत व प्रजातीनुरूप वेगवेगळे गुणधर्म प्रत्येक शेळीचे आहेत.

व्यवसायासाठी जात निवड महत्वाची : शेळीपालनासाठी आपल्याला फायदा देऊ शकेल आणि उपयुक्त अशा जातीची निवड करणे खूप महत्त्वाचे आहे. याच पार्श्वभूमीवर आज आपण शेळीच्या एका महत्त्वपूर्ण जाती विषयी थोडक्यात माहिती जाणून घेणार आहोत. त्यामुळे आता तुम्ही देखील शेळीपालन व्यवसायाच्या माध्यमातून मोठया प्रमाणात नफा मिळवण्याच्या विचारात असाल तर तुम्ही 'कोकण कन्याळ' या जातीच्या शेळ्यांचे पालन करू शकतात.


कोकण कन्याळविषयी माहिती : कोकण कन्याळ या जातीच्याशेळीचा विचार केला तर ही कोकण किनारपट्टीलगत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी, दोडामार्ग आणि कुडाळ या भागातील असून, विदर्भात देखील या जातीच्या शेळ्या काही प्रमाणात आढळतात. प्रामुख्याने मांस उत्पादनासाठी ही शेळी उपयुक्त असून, दर दोन वर्षात तीनदा करडांना जन्म देते.

किती वजन मिळते? ही शेळी वयाच्या १७ व्या महिन्यात पहिल्यांदा विते. तसेच तिचे दोन वेतातील अंतराचा विचार केला तर ते आठ महिने इतके असते. या शेळीचा सरासरी दूध उत्पादन काळ ९७ दिवसाचा असून, या कालावधीत ६० लिटर दूध देते. त्यासोबत या शेळीचा भाकड काळ ८४ दिवसांचा असतो. कोकण कन्याळ जातीच्या नराचे वजन हे २५ किलो तर मादी शेळीचे वजन २१ किलोपर्यंत भरते. एक ते दीड वर्षाच्या बोकडाच्या मटणाचा उतारा ५३ टक्के इतका असतो.

या शेळीचे शारीरिक गुणधर्म : या जातीच्या शेळीच्या वरच्या जबड्यावर पांढऱ्या व तांबूस रंगाचे पट्टे असतात. या जातीच्या शेळीचे पाय लांब असून पायावर काळा पांढरा रंग असतो. पाय लांब व मजबूत असल्यामुळे या शेळ्या डोंगराळ भागात सहज जुळवून घेतात. शिंगे टोकदार असतात व कपाळ चपटे व रुंद असते. शिंगे हे सरळ व मागे वळलेली असतात. नाक रुंद असते व स्वच्छ असते.



## सोयाबीनची बीबीएफवर लागवड फायदेशीरच



यंदा कमी पावसाची शक्यता आणि पावसाचा खंड पडण्याचा अंदाज लक्षात घेता, सोयाबीनच्या लागवडीसाठी रुंद वरंबा सरी पद्धत उपयुक्त ठरेल, असा सल्ला तज्ज्ञांकडून दिला जात आहे. या पद्धतीमुळे कमी पावसातही सोयाबीनचे चांगले उत्पादन शक्य होते.

बीबीएफ म्हणजे काय? रुंद वरंबा सरी म्हणजे ब्रॉड बेड फरो- बीबीएफ ही पेरणीची अशी पद्धत आहे, ज्यामध्ये शेतात वरंबे रुंद ठेवले जातात आणि त्यांच्यामध्ये सऱ्या म्हणजेच फरो तयार केल्या जातात. वरंब्यावर बियाण्यांची पेरणी केली जाते तर दोन्ही बाजूंच्या सऱ्या पावसाचे पाणी साठवण्याचे आणि अतिरिक्त पाण्याचा निचरा करण्याचे काम करतात. सुमारे ४ फूट सेंमी रुंदीचे वरंबे तयार होतात. या वरंब्यावर ३० सें.मी. अंतरावर सोयाबीनच्या चार ओळी पेरल्या जातात. एकुणच वरंब्याची रुंदी ४ ते ६.५ फूटापर्यंत ठेवता येते. तर सरीची खोली ९ इंच आणि रुंदी १ फूट असते. ही पद्धत विशेषत: सोयाबीन, तूर, कापूस, हरभरा आणि इतर खरीप पिकांसाठी उपयुक्त मानली जाते. रुंद वरंबा सरीमध्ये सोयाबीनची पेरणीची खोली साधारणत: ३ ते ५ सेंमी इतकी ठेवावी.

पावसाचे योग्य व्यवस्थापन : रुंद वरंब्यावर सोयाबीनची पेरणी केली जाते, तर सऱ्यांमध्ये पावसाचे पाणी साठते. हे पाणी हळूहळू जमिनीत मुरल्यामुळे पिकाला अधिक काळ ओलावा मिळतो. पावसाचा खंड पडला तरी हा ओलावा पिकाला तग धरून ठेवण्यास मदत करतो. तसेच अतिवृष्टी झाल्यास अतिरिक्त पाणी सऱ्यांमधून बाहेर जाते. त्यामुळे शेतात पाणी साचत नाही, मुळे कुजत नाहीत आणि त्यांची वाढ चांगली होते.

बियाणे, खत आणि पिकाची चांगली वाढ : बीबीएफ पेरणी यंत्राद्वारे एकाच वेळी वरंबे तयार करणे, पेरणी आणि खत देणे शक्य होते. त्यामुळे खत योग्य ठिकाणी पडून त्याचा अधिक फायदा पिकाला होतो. योग्य खोली व अंतरावर पेरणी झाल्यामुळे उगवण एकसारखी होते, रोपांची संख्या योग्य राहते आणि पिकाची वाढ समान होते.

आंतरमशागत सोपी आणि उत्पादनात वाढ : ओळी स्पष्ट असल्यामुळे तण नियंत्रण, कोळपणी आणि फवारणीची कामे सहज करता येतात. ओलाव्याचे योग्य व्यवस्थापन, खतांचा कार्यक्षम वापर आणि चांगली उगवण यामुळे सोयाबीनचे उत्पादन अधिक स्थिर आणि चांगले मिळण्यास मदत होते.

## पावसाळ्यात दूध उत्पादन टिकवण्यासाठी व्यवस्थापन

पावसाळ्यात वाढणारी आर्द्रता, चिखल आणि संसर्गजन्य रोगांमुळे जनावरांच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. याचा थेट फटका दूध उत्पादनालाही बसतो. त्यामुळे संतुलित आहार, वेळेवर लसीकरण, स्वच्छ गोठा आणि स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे अत्यंत आवश्यक असल्याचे पशुसंवर्धन विभागातील तज्ज्ञांनी सांगितले आहे. यासाठी पशुपालकांनी जनावरांच्या आरोग्याबाबत विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. योग्य आहार, वेळेवर लसीकरण आणि स्वच्छ शेड व्यवस्थापनाचा अवलंब केल्यास जनावरे निरोगी राहतात आणि दूध उत्पादनात सातत्य टिकून राहते, असे मत पशुसंवर्धन तज्ज्ञ यांनी व्यक्त केले आहे. पावसाळ्यात वातावरणातील बदलांचा थेट परिणाम जनावरांच्या आरोग्यावर होत असतो. या काळात हिरव्या चाऱ्याची उपलब्धता वाढत असली तरी त्याची गुणवत्ता कायम चांगली असेलच असे नाही. त्यामुळे जनावरांना संतुलित आहारासोबत खनिज मिश्रण, आवश्यक प्रमाणात मीठ आणि स्वच्छ पिण्याचे पाणी नियमित उपलब्ध करून देणे अत्यंत गरजेचे असल्याचे डॉ. काळुसे यांनी सांगितले.

कुजलेल्या चाऱ्यामुळे वाढतो आजारांचा धोका : पावसाळ्यात ओलाव्यामुळे चाऱ्यावर बुरशी येण्याची शक्यता अधिक असते. बुरशी लागलेला किंवा कुजलेला चारा जनावरांना दिल्यास विषबाधा, अपचन, पोटाचे विकार आणि दूध उत्पादनात घट होऊ शकते. त्यामुळे चारा साठवताना आणि जनावरांना देताना पशुपालकांनी विशेष दक्षता घ्यावी, असा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे.



संसर्गजन्य रोगांपासून संरक्षणासाठी लसीकरण :पावसाळ्यात घटसर्प, लाळखुरकत आणि ब्लॅक क्वार्टर यांसारख्या संसर्गजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली जनावरांचे वेळेवर लसीकरण करून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जनावरांमध्ये ताप येणे, भूक मंदावणे, खुरांचे विकार, अशक्तपणा किंवा इतर असामान्य लक्षणे दिसल्यास उपचारात विलंब न करता तातडीने पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांचा सल्ला घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.

स्वच्छ शेड व्यवस्थापन महत्त्वाचे : पावसाळ्यात जनावरांच्या शेडमध्ये पावसाचे पाणी साचल्यास विविध रोगांचा धोका वाढतो. त्यामुळे गोठ्यातील स्वच्छता, निर्जंतुकीकरण आणि हवा खेळती राहील याची काळजी घेणे आवश्यक आहे. गोठा कोरडा ठेवणे, नियमित साफसफाई करणे आणि साचलेले पाणी त्वरित बाहेर काढणे यामुळे अनेक आजार टाळता येऊ शकतात.

पावसाळ्यात पशुपालकांनी काय करावे? जनावरांना संतुलित आहारासह खनिज मिश्रण व मीठ द्यावे. स्वच्छ आणि पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे. बुरशी लागलेला किंवा कुजलेला चारा देणे टाळावे. गोठ्याची नियमित स्वच्छता व निर्जंतुकीकरण करावे. शेडमध्ये पावसाचे पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. गोठ्यात हवा खेळती राहील अशी व्यवस्था ठेवावी. पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सल्ल्याने वेळेवर लसीकरण करावे.

या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका : ताप येणे, भूक मंदावणे, खुरांचे विकार, सुस्ती किंवा अशक्तपणा, लाळखुरकत, घटसर्प किंवा ब्लॅक क्वार्टर अशी लक्षणे दिसून आल्यास त्वरित पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाने केले आहे.

आरोग्यदायी व्यवस्थापन गरजेचे : पावसाळ्यात जनावरांचे योग्य व्यवस्थापन केल्यास केवळ रोगांपासून संरक्षणच होत नाही, तर दूध उत्पादनातही वाढ होते. त्यामुळे पशुपालकांनी आहार, आरोग्य आणि स्वच्छतेच्या बाबतीत कोणतीही तडजोड न करता शास्त्रीय पद्धतींचा अवलंब करावा, असे आवाहन तज्ज्ञांनी केले आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६९३ : संभाजीराजांच्या मृत्यूनंतर मोगलांकडे गेलेला सिंहगड नवजी बलकवडे यांनी पुन्हा स्वराज्यात आणला.
१८७४ : टंकलेखक (टाईपरायटर) पहिले व्यावसायिक टंकलेखन यंत्र (टाइपराइटर) ची विक्री सुरु झाली.
१८७९ : भारतात पोस्टकार्ड बाजारात विक्रीस उपलब्ध झाली.
१९०९ : क्रांतिकारक मदनलाल धिंग्राने भारतमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक कर्नल विल्यम कर्झन वायली यांची इंपिरिअल इन्स्टिट्युटच्या 'जहांगिर हाऊस'मधे इंडियन नॅशनल असोसिएशनच्या सभेच्या वेळी गोळ्या झाडून हत्या केली.
१९१९ : कै. बाबूराव ठाकूर यांच्या 'तरुण भारत' (बेळगाव) या वृत्तपत्राची सुरूवात झाली.
१९३३ : नाट्यमन्वंतर संस्थेच्या 'आंधळ्यांची शाळा' या नाटकाचा पहिला प्रयोग झाला.
१९३४ : मानवी शरीराचे सर्वप्रथम छायाचित्र घेण्यात अमेरिकन डॉक्टरांना यश
१९४८ : बाजारपेठेतील व्यापार्यांचे नेतृत्त्व करणार्या 'पूना मर्चंट्स चेंबर' या संस्थेची स्थापना
१९४८ : 'कायदेआझम' मुहम्मद अली जीना यांच्या हस्ते 'स्टेट बँक ऑफ पाकिस्तान' या पाकिस्तानच्या मध्यवर्ती बँकेचे उद्घाटन झाले.
१९४९ : त्रावणकोर व कोचीन ही दोन संस्थाने एकत्र करुन 'थिरुकोची' संस्थान निर्माण करण्यात आले. याचेच पुढे केरळ राज्य बनले.
१९५५ : 'स्टेट बँक ऑफ इंडिया अ‍ॅक्ट १९५५' अन्वये स्टेट बँक ऑफ इंडिया अस्तित्त्वात आली. याआधी ही बँक इंपिरिअल बँक या नावाने ओळखली जात होती.
१९६० : रवांडा व बुरुंडी हे देश स्वतंत्र झाले.
१९६१ : महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार पुणे विद्यापीठाचे चौथे कुलगुरू झाले.
१९६२: सोमालिया व घाना हे देश स्वतंत्र झाले.
१९६४ : न. वि. गाडगीळ पुणे विद्यापीठाचे पाचवे कुलगुरू झाले.
१९६४ : भारतीय औद्योगिक विकास बँकेची स्थापना
१९७५ : भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी २० सूत्री कार्यक्रमाची घोषणा केली.
१९९७ : शतकातील सर्वोत्कृष्ट वेटलिफ्टर्सच्या यादीत भारताच्या कुंजरानी देवीचा समावेश करण्यात आला.
२००२ : आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायालय स्थापना झाली.
२०१५ : डिजिटल इंडिया या प्रकल्पाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.
२०१७ : देशांतील अर्थव्यवस्थेमध्ये महत्वपूर्ण सुधारणा म्हणून वस्तू व सेवाकर (जीएसटी) संपूर्ण भारतात लागू करण्यात आला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६४६ : प्रख्यात जर्मन गणितज्ञ व तर्कशास्त्र विद्वान गाटफ्रीड विलहेल्म लाइबनिज( ) यांचा जन्मदिन.
१८८२ : डॉ. बिधनचंद्र रॉय भारतरत्न (१९६१), आंतरराष्ट्रीय कीर्तीचे निष्णात डॉक्टर, आधुनिक बंगालचे शिल्पकार, पश्चिम बंगालचे दुसरे मुख्यमंत्री, काँग्रेसचे नेते, कलकत्ता विद्यापीठाचे कुलगुरु, ब्राम्हो समाजाचे सदस्य (मृत्यू: १ जुलै १९६२ कलकत्ता, पश्चिम बंगाल)
१८८७ : कविवर्य एकनाथ पांडुरंग रेंदाळकर (मृत्यू: ? ? १९२०)
१९१३ : वसंतराव जाईक महाराष्ट्राचे दुसरे मुख्यमंत्री, रोजगार हमी योजनेचे जनक (मृत्यू: १८ ऑगस्ट १९७९)
१९३८ : प्रख्यात भारतीय हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत परंपरेतील महान बासुरी वादक, संगीत दिग्दर्शक आणि थोर शास्त्रीय कलाकार पंडित हरिप्रसाद चौरसिया यांचा जन्मदिन.
१९४९ : वेंकय्या नायडू केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री आणि भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष, भारताचे वे१३ उपराष्ट्रपती
१९६१ : कल्पना चावला भारतीय वंशाच्या अमेरिकन अंतराळवीर (मृत्यू: १ फेब्रुवारी २००३)
१९६६ : उस्ताद राशिद खान रामपूर-साहसवान घराण्याचे शास्त्रीय गायक
१९६८ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध हिंदुस्थानी संगीत परंपरेतील रामपूर-साहसवान घराण्यातील शास्त्रीय संगीतकार उस्ताद रशीद खान यांचा जन्मदिन.
१९७३ : साली प्रसिद्ध भारतीय राजकारणी व समाजवादी पक्षाचे अध्यक्ष तसचं, उत्तरप्रदेश राज्याचे माजी मुख्यमंत्री अखिलेश कुमार यादव यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८६० : चार्ल्स गुडईयर रबरावरील व्हल्कनायझेशन ही प्रक्रिया शोधणारे अमेरिकन संशोधक (जन्म: २९ डिसेंबर १८००)
१९३८ : गणेश श्रीकृष्ण तथा 'दादासाहेब' खापर्डे प्रख्यात कायदेपंडित, विद्वान आणि राजकीय नेते, लोकमान्य टिळकांचे निकटचे सहकारी, 'वर्‍हाडचे नबाब' (जन्म: २७ ऑगस्ट १८५४)
१९४१ : सर सी. वाय. चिंतामणी स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रागतिक पक्षाचे नेते व श्रेष्ठ वृत्तपत्रकार, पहिल्या गोलमेज परिषदेचे विशेष अतिथी, उत्तरप्रदेशचे शिक्षणमंत्री (जन्म: १० एप्रिल १८८० विजयनगरम, आंध्र प्रदेश)
१९६२ : पुरुषोत्तम दास टंडन स्वातंत्र्यसेनानी, भारतरत्न (१९६१), राष्ट्रभाषा हिन्दीचे समर्थक, अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष (जन्म: १ ऑगस्ट १८८२)
१९६२ : डॉ. बिधनचंद्र रॉय भारतरत्न (१९६१), आंतरराष्ट्रीय कीर्तीचे निष्णात डॉक्टर, आधुनिक बंगालचे शिल्पकार, पश्चिम बंगालचे दुसरे मुख्यमंत्री, काँग्रेसचे नेते, कलकत्ता विद्यापीठाचे कुलगुरु, ब्राम्हो समाजाचे सदस्य (जन्म: १ जुलै १८८२ पाटणा, बिहार)
१९६९ : मुरलीधरबुवा निजामपूरकर कीर्तनकार
१९७१ : सर विल्यम लॉरेन्स ब्रॅग (ऑस्ट्रेलियन-ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेता, )
१९८९ : प्राचार्य ग. ह. पाटील कवी व शिक्षणतज्ञ, 'माझ्या मामाची रंगीत गाडी हो', 'देवा तुझे किती, सुंदर आकाश', 'डराव डराव, डराव डराव, का ओरडता उगाच राव' अशी त्यांची अनेक बालगीते लोकप्रिय आहेत. (जन्म:)
१९९४ : राजाभाऊ नातू दिग्दर्शक, नेपथ्यकार, प्रकाशयोजक व नाट्य संघटक (जन्म:)
१९९९ : एम अँड एम चे संस्थापक फॉरेस्ट मार्स सीनियर यांचे निधन. (जन्म: २१ मार्च १९०४)







# समाजात तेढ निर्माण करणाऱ्या समाजकंटकविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी

मंठा। प्रतिनिधी

मुंबई येथील आझाद मैदान येथे अण्णाभाऊ साठे क्रांती सेना आयोजित सभेत जालना येथील संजय इंचे याने दोन समाजात तेढ निर्माण होईल अशी बेताल वक्तव्य केल्यामुळे त्यांच्यासह मोर्च्याचे आयोजक सचिन साठे यांचे विरुद्ध गुन्हा दाखल करावा अशी मागणी आरक्षण बचाव कृती समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

या संदर्भात मंठा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख यांना निवेदन देण्यात आले असून या निवेदनात म्हटले आहे की, अखंड महाराष्ट्र फुले, शाहु, आंबेडकरी विचारावर चालतो हे महाराष्ट्रातील सर्व नागरिकांना ज्ञात असताना अनुसूचित जाती प्रवर्गातील अ, ब, क, ड समर्थनार्थ



मुंबई येथील आझाद मैदान येथे अण्णाभाऊ साठे क्रांती सेना आयोजित सभेत जालना येथील संजय इंचे याने महाराष्ट्र फुले, शाहु, आंबेडकर यांचा नाही अशी बेताल वक्तव्य केल्यामुळे दूषित वातावरण निर्माण झाले आहे. अखंड महाराष्ट्रात वातावरण दुषित करणारा संजय इंचे व मोर्चाचे आयोजक सचिन साठे यांच्यावर भारतीय दंड संहितेच्या (आयपीसी) कलम १५३ -अ, २९५ अ, ५०५ (१) (क) व अन्य संबधीत कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात यावा. अशी मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर उपनगराध्यक्ष अरुण वाघमारे, नगरसेवक राजेश खंदारे, शरद मोरे, अशोक अवचार, रवी सदावर्ते, गंगाराम गवळी, प्रदीप उघडे, अमोल गायकवाड, उद्धव सरोदे, जिजाभाऊ देशमाने, उमेश रंजवे, दादाराव हिवाळे, आसाराम चोरमारे, समाधान शिंदे, समाधान चोरमारे, प्रकाश घुले, मनोहर वाघमारे, संदेश प्रधान, धम्मानंद वाघमारे, विशाल प्रधान, सर्जेराव गायकवाड, आकाश खरात यांच्या सह्या आहेत.

## लाच स्वीकारताना वैजापूर येथे ग्रामीण गृहनिर्माण अभियंता एसीबीच्या जाळ्यात

### पंतप्रधान आवास योजनेच्या दुसऱ्या हप्त्यासाठी घेतली १ हजाराची लाच

वैजापूर

वैजापूर पंचायत समिती पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. प्रभारी गटविकास अधिकारी, प्रशासकीय कारभारावरील प्रश्न, बैठकींतील गोंधळ आणि कामांमध्ये टक्केवारीच्या चर्चांमुळे आधीच टीकेचे धनी ठरलेल्या पंचायत समितीवर आता भ्रष्टाचाराचा आणखी एक डाग लागला आहे. सोमवारी (२९ जून) पंतप्रधान आवास योजनेच्या लाभार्थीला दुसरा हप्ता मिळवून देण्यासाठी जिओ-टॅगिंग व फोटो अपलोड करण्याच्या कामाच्या मोबदल्यात अवघ्या १ हजारांची लाच स्वीकारताना ग्रामीण गृहनिर्माण अभियंता प्रवीण गायकवाड (रा. पानवी) याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले.

तक्रारदाराने लाच देण्यास नकार देत एसीबीकडे तक्रार केली होती. पडताळणीत लाच मागणी स्पष्ट झाल्यानंतर सोमवारी



सापळा रचण्यात आला. लाचेची रक्कम स्वीकारताच एसीबीच्या पथकाने आरोपीला ताब्यात घेतले. आरोपीकडून लाचेची रक्कम, इतर रोख रक्कम आणि दोन मोबाइल जप्त केले. पोलिस निरीक्षक शांतीलाल चव्हाण यांनी कारवाईचे नेतृत्व केले, तर पोलिस निरीक्षक प्रतिभा अबूज तपास अधिकारी आहेत.

## नगरमध्ये वटपौर्णिमेला परंपरेसोबतच पर्यावरणाचेही संवर्धन

### महापालिकेने दिला पर्यावरण संवर्धनाचा संदेश, महिलांना मोफत रोपांचे केले वाटप

अहिल्यानगर। प्रतिनिधी

भारतीय संस्कृतीतील वृक्षपूजनाची परंपरा आणि पर्यावरण संवर्धनाची आधुनिक गरज यांचा संगम घडवत साई द्वारका सेवा ट्रस्ट व अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या 'पालकमंत्री ग्रीन सिटी' अभियानांतर्गत वटसावित्री पौर्णिमेच्या सणानिमित्त महिलांना मोफत वडाच्या रोपांचे वितरण करण्यात आले. पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणाऱ्या या अभिनव उपक्रमाला महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत शहराला हरित बनविण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते वडाच्या रोपांचे वितरण करण्यात आले. यावेळी माजी नगरसेविका सुप्रिया जाधव, अर्चना परकाळे, पुनम मुथा, दीपाली काकडे, जया शेलार, अर्चना काकडे, सुनीता कवळे, सीमा काकडे आदी महिला उपस्थित होत्या.

उपमहापौर जाधव यांनी ग्रीन सिटी' ही केवळ एक योजना नसून प्रत्येक नागरिकाचा सहभाग असलेली सामाजिक लोकचळवळ असल्याचे सांगितले. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येक कुटुंबाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी केले. आज लावलेले प्रत्येक रोप उद्याच्या पिढ्यांना शुद्ध हवा, स्वच्छ पर्यावरण आणि समृद्ध जीवन देईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. माजी नगरसेविका सुप्रिया धनंजय जाधव यांनी वटसावित्री पौर्णिमेचे धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय महत्त्व अधोरेखित केले. भारतीय संस्कृतीत वडाच्या वृक्षाला दीर्घायुष्य, समृद्धी आणि जीवनदायी शक्तीचे प्रतीक मानले जाते. त्यामुळे परंपरेचे जतन करताना पर्यावरण संवर्धनाची जबाबदारीही प्रत्येकाने स्वीकारली पाहिजे, असे त्या म्हणाल्या. यावेळी कैलास दिघे, हर्षल आगळे, अशोक कुटे, ॲड. दिनानाथ जाधव, राहुल मुथा, सोनू बोरुडे यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अमोल बागुल यांनी केले तर उपस्थितांचे आभार हर्षल आगळे यांनी मानले. वटसावित्रीच्या निमित्ताने श्रद्धा, संस्कृती आणि पर्यावरण संवर्धनाचा त्रिवेणी संगम घडविणाऱ्या या उपक्रमाने 'एक रोप. एक जबाबदारी एक हरित भविष्य' हा संदेश प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचवण्यात आला. धार्मिक परंपरेसोबत पर्यावरणीय जबाबदारीची गरज माजी नगरसेविका सुप्रिया धनंजय जाधव यांनी वटसावित्री पौर्णिमेचे धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय महत्त्व अधोरेखित केले. त्या म्हणाल्या, ''भारतीय संस्कृतीत वडाच्या वृक्षाला दीर्घायुष्य, समृद्धी आणि जीवनदायी ऑक्सिजन देणारी शक्ती मानले जाते. त्यामुळे केवळ परंपरेचे जतन करून चालणार नाही, तर पर्यावरण संवर्धनाची प्रत्यक्ष जबाबदारीही आपल्या सर्वांना स्वीकारावी लागेल.''वटपौर्णिमेच्या निमित्ताने श्रद्धा, संस्कृती आणि निसर्ग रक्षणाचा त्रिवेणी संगम साधत 'एक रोप, एक जबाबदारी, एक हरित भविष्य' हा अत्यंत प्रभावी संदेश या उपक्रमाद्वारे समाजापर्यंत पोहोचवण्यात आला.

## मंठ्यात ढगफुटीसदृश पाऊस; अंबड येथे विजांच्या कडकडाटासह बरसला

### गावालगतच्या नाल्याचे पाणी शिरले अनेक घरांमध्ये

मंठा

सोमवारी (दि. २९) दुपारच्या सुमारास जालना जिल्ह्यातील मंठा परिसरात ढगफुटीसदृश, तर अंबड शहरासह परिसरातील अनेक भागांमध्ये विजांच्या कडकडाटासह जोरदार पुनरागमन केले. हा पाऊस खरीप पिकांच्या उगवणीसाठी आणि वाढीसाठी अत्यंत लाभदायक ठरणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळत आहे. दरम्यान, ढोकसाळ तांड्यात पावसाचे पाणी शिरल्याने काही वेळ नागरिकांत भीतीचे वातावरण पसरले होते. रात्री जालना शहरातही पाऊस झाला.

एकीकडे पावसाने शेतकऱ्यांना दिलासा दिला असतानाच दुसरीकडे मंठा तालुक्यातील मौजे ढोकसाळ परिसरात झालेल्या जोरदार पावसामुळे गावालगत असलेल्या नाल्याला अचानक मोठ्या प्रमाणात पूर आला. नाल्याचे



पाणी वेगाने वाढल्यामुळे ढोकसाळ तांड्याचा मुख्य गावांशी असणारा संपर्क तात्पुरता तुटला आहे. तसेच पुराचे पाणी थेट तांड्यातील घरांमध्ये आणि रस्त्यांवर शिरल्याने नागरिकांमध्ये कमालीचे भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अंबड शहरातही सोमवारी दुपारनंतर हवामानात अचानक बदल होऊन सायंकाळच्या सुमारास विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाने हजेरी लावली. अवघ्या काही वेळातच झालेल्या या धुवाधार पावसामुळे शहरातील सखल भाग, मुख्य रस्ते तसेच गजबजलेल्या बाजारपेठ परिसरात मोठ्या प्रमाणावर पाणी साचले. रस्त्यांवरून पाण्याचे लोंढे वाहत असल्याने रस्त्यांना नदी-नाल्यांचे स्वरूप आले होते. अचानक आलेल्या या मुसळधार पावसामुळे कामावरून घरी परतणारे पादचारी आणि वाहनचालक यांची चांगलीच धावपळ उडाली, तर काहींना सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा लागला.


**जाहीरनामा**

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय केज, जि.बीड**

**एम ए जी विभाग**

ई मेल kaijtahsildarar@gmail.com

**दुरध्वनी क्र. ०२२४५-२५२६४५**

**के.२०२६/एमएजी/कावि/४६६**

**दिनांक:-७-५.२०२६**

सर्व जनता मौजे टाकळी ता. केज यांना जाहीर केले जाते की, टाकळी येथील जन्म पावलेली इसम नामे पुजा कल्याण घुले हिचा जन्म दिनांक-१४/०७/२०१० रोजी मौजे टाकळी ता. केज येथे झालेला असुन व जन्म नोंद आदेश ग्रामपंचायत अधिकारी ग्राम पंचायत टाकळी यांना देणे बाबत त्यांचा वडील नामे कल्याण अंकुश घुले रा. टाकळी ता. केज जि. बीड यांनी या कार्यालयास दि. १७.०३.२०२६ रोजी अर्ज व शथपत्र सादर करुन सोबत ग्राम पंचायत टाकळी यांचे जन्म नोंद नसल्याचे प्रमाण पत्र, नोटरी करुन शपथपत्र सादर करुन ग्राम पंचायत टाकळी ता. केज यांना त्यांच्या मुलीचा जन्म नोंद घेणे बाबत आदेश देणेस विनंती केली आहे. २/- पुजा कल्याण घुले हिचा जन्म नोंद घेणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास जाहीरनामा प्रसिध्दी पासुन १५ दिवसाचे आत लेखी आक्षेप व त्या पृष्ठायर्थ योग्य तो पुरावा या कार्यालयास समक्ष दाखल करावा. मुदती नंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व ग्राम पंचायत कार्यालय टाकळी ता. केज यांना जन्म नोंद घेणेचा आदेश देण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-

कार्यकारी दंडाधिकारी, केज


## हजारोंचे अश्रू पुसणाऱ्या, आनंदाच्या क्षणी दुर्लक्षित स्मशान जोग्यांचा सत्कार

### अर्थ अभ्यासक डॉ. डी. एस. काटे यांची नाविन्यपूर्ण संकल्पना


**टीसी हरवला आहे**

कोळेकर लशांत अनिल या नावाचा इ.१२ वी पास चा टीसी (दाखला) बीड ते पुणे बस प्रवासामध्ये हरवला आहे सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा

संपर्क

८५५१८२३४७४


छत्रपती संभाजीनगर

अर्थ विषयक अभ्यासक आणि प्रसिद्ध उद्योजक अभियंता डॉ. डी. एस. काटे यांच्या वतीने नाविन्यपूर्ण संकल्पना राबवत शहरातील विविध स्मशान भूमीत अविरत सेवा देणाऱ्या चाळीसहुन अधिक स्मशान जोग्यांचा सत्कार पारंपारिक पद्धतीने करण्यात आला. या वेळी डॉ. डी. एस. काटे म्हणाले की, कधी न केलेल्या या नावीन्यपूर्ण उपक्रमांची सुरुवात छत्रपती संभाजीनगर मधून पहिल्यांदाच होत आहे. काम कुठलेही असो श्रेष्ठत्व हे कामावर अवलंबून नसते तर ते मनुष्यपणावर अवलंबून असते. समाजसेवेचा वसा हाती घेतल्यास तो निस्वार्थपणे पार पडावा आणि खऱ्या अर्थाने समाजातील गोर-गरिबांची सेवा घडावी असे सांगत हा उपक्रम सामाजिक भावनेतून नागरिकांनी आपापल्या विशेष दिनी राबवावा असे त्यांनी आपली भावना व्यक्त करतांना स्पष्ट केले.

डॉ. डी.एस. काटे यांची अर्थ तज्ञ म्हणून एक वेगळी ओळख असून त्यांच्या लेखणीतून साकारलेल्या विविध प्रकाशित पुस्तक, ग्रंथ हे देशाची अर्थ व्यवस्था मजबूत करण्यासाठी संजीवनी देणारी ठरली आहे. अर्थदिशा, अर्थजागर, अर्थसंपदा, अर्थनीती या पुस्तकांचे लेखन केल्याने विविध पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. सद्दः स्थितीत सर्व क्षेत्रात सातत्याने होत असलेले बदल, त्यातून बदलत जाणारे अर्थ नियोजन आणि निर्माण होणारे विविध प्रश्न या सर्वांचे सामान्य वाचकांना सर्वांगीण आकलन व्हावे आणि त्याचा त्यांनी फायदा आकारून घेत आपले जीव समृध्द करावे असा त्यांचा प्रयत्न आहे. व्यवहार आणि पैशांचा विनियोग याविषयी योग्य समज त्यांच्या विविध पुस्तकातून आजही वाचकांना उभारी देत आहेत. डॉ. डी. एस. काटे यांनी शहरातील स्मशान जोग्याना आपल्या आनंदात सहभागी करून घेत त्यांचा सहकुटुंब गौरव केला. आयुष्याच्या शेवटीही स्मशानभूमीत साथ देणारा स्मशान जोगी नेहमीच आनंदाच्या क्षणी दुर्लक्षित राहिला आहे. रक्ताची नाती सोडून जाणारी मानसिकता असलेल्या या समाजात स्मशान जोगी मात्र स्मशानात आलेल्या कुटुंबाचे सांत्वन करून राख होईपर्यंत हे जग सोडून गेलेल्या माणसाच्या सोबतीला असतो. इतरांच्या दुखाबरोबरच आपलेही दुख: पोटात घालून स्मशान जोगी कायम त्या स्मशानात दुखा:च्या छायेत वावरत असतो. आणि म्हणूनच एक सामाजिक दायित्व म्हणून या स्मशान जोग्यांच्या चेहऱ्यावर सुखाचे हास्य फुलवण्यासाठी डॉ. काटे यांच्या स्मशान जोग्यांचा भव्य सत्कार केला. यावेळी माजी केंद्रीय अर्थ राज्य मंत्री डॉ. भागवत कराड, माजी विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर, शेषराव चव्हाण, मनपा स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. दिलीप घारे, एकनाथ जाधव, सुभाष पाटील, प्रा. डॉ. शिवानंद भानुसे, कवी विष्णू सुरासे, ॲड. अजित काळे, स्मशान जोगी संघटनेचे अध्यक्ष गोविंद राजाराम गायकवाड आदींची यावेळी उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रेम प्रकाश बांगर यांनी केले.


**जाहिर प्रगटन**

**मा.श्री. रिजवान उ. शेख ४ थे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड, ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८७७/२०२६**

**ॲड. जी.एस. घुगे**

**अंबादास वि. निरंक**

ज्यापेक्षा देविदास हरिभाऊ जोगदंड, हे दिनांक ०४/११/२००० रोजी, कटकटपुरा, जुनी भाजी मंडई, बीड, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत, तसेच अर्जदार १. अंबादास पि. देविदास जोगदंड, वय.७१ वर्षे, धंदा.निरंक, रा. जुनी भाजी मंडई, कटकटपुरा, बीड, ता.जि.बीड अर्जदार हा मयत देविदास हरिभाऊ जोगदंड यांचा मुलगा आहे. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा/अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहु मयत नामे देविदास हरिभाऊ जोगदंड, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख २३/०७/२०२६ ही आहे.

आज दिनांक ३० जून २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्या निशी दिले.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपिक, दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

स्वाक्षरीत/- अधिक्षक, चौथे दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड



**जाहीर प्रगटन**

**मा.श्री. व्ही.सी. जोशी, ९ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ७६३/२०२६,**

**ॲड. एम.आर. उबाळे यांच्यामार्फत**

**मुकुंद कल्याण उगले वि. निरंक**

ज्यापेक्षा शारदा भ्र. कल्याण उगले हे दिनांक १०.०९.२०१२ रोजी माळापुरी, ता.जि. बीड येथे मयत झालेले आहेत आणि तसेच अर्जदार १) मुकूंद कल्याण उगले, वय ३३ वर्षे, धंदा शेती, रा. माळापुरी, ता.जि. बीड, २) उमा भ्र. सखाराम गव्हाणे, वय ३७ वर्षे, धंदा घरकाम, रा. कुर्ला, ता.जि. बीड ३) सीमा भ्र. गणेश तिपाले, वय ३६ वर्षे, धंदा घरकाम, रा. भक्ती सागर जवळ, वडगाव, मावळ, पुणे. ४) कल्याण पि. रायभान उगले, वय ५३ वर्षे, धंदा शेती, रा. माळापुरी, ता.जि. बीड अर्जदार क्रं. १ ही मयत नामे शारदा भ्र. कल्याण उगले यांचा मुलगा आहे. अर्जदार क्रं. २ व ३ या मयताच्या विवाहित मुली आहेत. अर्जदार क्रं. ४ हे मयताचे पती आहेत. या अर्जदारां व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत असे वरील अर्जदाराचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहू मयत शारदा भ्र. कल्याण उगले यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख ०५/०८/२०२६ आहे.

आज दिनांक ३० जून २०२६ रोजी माझया सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरीत/- क. लिपीक

स्वाक्षरीत/- अधिक्षक, दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड



**जाहीर प्रगटन**

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), अंबड यांचे न्यायालय**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १११/२०२६**

**पु.ता. २२/०७/२०२६.**

अर्जदार: १) सर्जेराव गणपतराव पटेकर, वय ५५ वर्षे, २) रामराव गणपतराव पटेकर, वय ४५ वर्षे, ३) लता गणपतराव पटेकर, वय ५७ वर्षे, अ.क्र. १ ते ३ रा. कुक्कडगाव, ता. अंबड, जि. जालना ४) कौशल्या शिवाजी खंडागळे, वय ५४ वर्षे, अ.क्र. ४ रा. शहापुर, ता. अंबड, जि. जालना

विरुध्द गैरअर्जदार निरंक

कलम - २ व ७ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ॲड.एल.ए. गायके यांच्यामार्फत अर्जदारानी या न्यायालयात अर्ज केला आहे की, गणपत विठ्ठल पटेकर हे दिनांक १०/०९/१९८० रोजी मयत झाले आहे व समिंद्राबाई गणपत पटेकर हे दिनांक १७/११/२००८ रोजी मयत झाले आहे. मयत गणपत विठ्ठल पटेकर व समिंद्राबाई गणपत पटेकर यांचे अर्जदार व गैरअर्जदार हे कायदेशीर वारस आहेत. म्हणून अर्जदाराने शासकीय व निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यामुळे सदरील अर्ज वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

करीता या जाहीर प्रगटनाद्वारे सर्वत्र कळविण्यात येते की, याबाबत जर कोणास काही एक आक्षेप असेल तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसाच्या आत या न्यायालयात आपला आक्षेप सादर करावा. जर नमुद केलेल्या काळात कोणाचाही आक्षेप आला नाही, तर संबंधीत प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि. २३/०६/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरीत/- मुकेश बी. मापारी, क. लिपीक

स्वाक्षरीत/- अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर, अंबड


## ६ एकरवर फुलणार १५ हजार देशी वृक्षांचे हरितवन

### कालिका स्टीलचा पुढाकार; जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते उपक्रमाचा शुभारंभ

जालना। प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील अत्यल्प वन क्षेत्राच्या पार्श्वभूमीवर शहरातील कालिका स्टील कंपनीने पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घेतला आहे. त्यानुसार त्यांच्या सहा एकर परिसरात तब्बल १५ हजार देशी प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमाचा शुभारंभ सोमवारी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आला. जालना औद्योगिक वसाहतीतील कंपनीच्या परिसरात टप्प्याटप्प्याने लिंब, वड, पिंपळ, करंज, आंबा, अर्जुन, बहावा, जांभूळ अशी देशी प्रजातींची झाडे लावली जाणार आहेत. केवळ वृक्षारोपण न करता ही झाडे दीर्घकाळ जिवंत राहावीत, यासाठी उन्हाळ्यातही नियमित पाणीपुरवठा आणि देखभालीचे नियोजन कंपनीने स्वतःच्या खर्चातून केले आहे. त्यामुळे हा उपक्रम केवळ औपचारिक वृक्षारोपण न राहता दीर्घकालीन हरित संवर्धनाचा प्रयत्न ठरणार आहे. उपक्रमाच्या शुभारंभप्रसंगी पोलिस अधीक्षक तेघबीरसिंग संधू, कालिका स्टीलचे संचालक घनश्याम गोयल, अरुण अग्रवाल, गोपाल गोयल, गोविंद गोयल यांच्यासह कंपनीचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी या वेळी जालनेकर, स्वयंसेवी संस्था, उद्योग-व्यवसाय आणि विविध आस्थापनांना मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्याचे आवाहन केले. ''जिल्ह्यात वनक्षेत्र एक टक्क्यापेक्षाही कमी आहे. त्यामुळे प्रत्येकाने वृक्ष लागवडीत सहभाग घ्यावा, असेही त्या म्हणाल्या. लागवड केलेली १५ हजार झाडे जगवण्यासाठी प्रयत्न करणार आहे. त्यासाठी उन्हाळ्यात पाणी देण्याचे नियोजन करणार आहोत. ही सर्व झाडे जगवण्यासोबतच यात दरवर्षी आणखी झाडे लावण्याचे नियोजन आहे. काही वर्षांत ६ एकरांचा परिसर हिरवागार झालेला दिसेल.

# आ.नमिता मुंदडाकडे सत्ता, विकासकामाचा नाही पत्ता

## दिलेला शब्द विसरल्या, नाविलाजाने गावकऱ्यांनी स्वखर्चातून तयार केला रस्ता

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील बनकरांजा येथील उपसा वस्ती ते पवारवाडी हा वस्ती रस्ता शासनाच्या निधीची वाट न पाहता ग्रामपंचायतीने केलेले दुर्लक्ष त्यामुळे सर्व वस्तीवरील ग्रामस्थांनी मिळून एकजुटीने लोकसहभागातून सुमारे दीड किलोमीटर लांबीचा रस्ता तयार केला आहे. गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या या रस्त्याचा प्रश्न ग्रामस्थांनी स्वतः पुढाकार घेऊन मार्गी लावल्याने ग्रामपंचायत चा नाकारतेपणा समोर आला आहे व स्वखर्चाने वस्ती रस्त्याचे काम केल्यामुळे नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

बनकरंजा गावांतर्गत उपसा वस्ती ते धनगरवाडा, चिंचाशेत वस्ती व पवारवाडी यादरम्यान दीड किलोमीटर रस्ता अतिशय खराब असल्याने लोकांना ये जा करण्यास मोठ्या प्रमाणात अडचण येत होती ज्यामुळे शाळकरी मुले आणि शेतकरी यांना रस्त्यावरून ये जा करणे अत्यंत कठीण झाले होते एखाद्या आजारी व्यक्तीला रुग्णालयात येण्यासाठी रुग्णवाहीकाही वस्तीपर्यंत पोहोचू शकत नव्हती प्रशासनाकडे अनेकदा मागण्या करूनही निधी अभावी हे काम रखडलेले होते शेवटी प्रशासनाच्या व ग्रामपंचायतच्या दिरंगाईला कंटाळून वस्तीवरील तरुणांनी व ज्येष्ठ नागरिकांनी एकत्र येऊन आपला रस्ता आपणच करणार असा निर्धार केला यासाठी वस्तीवरील लोकांनी बैठक घेऊन नियोजन केले.







वस्तीवरील प्रत्येक कुटुंबाने आपल्या क्षमतेनुसार आर्थिक वाटा उचलला आणि अनेक वर्षांपासून रखडलेला वस्ती रस्ता ये जा करण्यासाठी तयार करून घेतला ग्रामस्थांच्या या सामूहिक प्रयत्नामुळे अवघ्या काही दिवसातच चिखलमय आणि खडकाळ असलेला या रस्त्याचे रूप पालटले असून आता हा रस्ता वाहतुकीसाठी बऱ्यापैकी चांगला झालेला आहे शासनावर विसंबून न राहता स्वावलंबन काय असते याचा एक आदर्श या उपसवस्ती, धनगरवाडा, चिंचाशेत पवारवाडी या वस्तीवरील लोकांनी घालून दिला आहे. व येणाऱ्या काळात मतदान मागण्यास आल्यावर लोकप्रतिनिधींना त्यांच्याच भाषेत जॉब विचारण्यात येणार आहे असे वस्तीवरील लोकांमधून बोलले जात आहे.

## अवैध वाळू वाहतुकीचा जप्त ट्रॅक्टर पोलीस कस्टडीतून पळवणाऱ्या चोरट्यांना २४ तासांत अटक

गेवराई । प्रतिनिधी

महसूल विभागाने अवैध वाळू वाहतुकीप्रकरणी जप्त करून गेवराई बस आगार येथे लावलेला ट्रॅक्टर अज्ञात चोरट्यांनी चोरून नेला होता. या गंभीर प्रकरणाची दखल घेत गेवराई पोलिसांनी अवघ्या २४ तासांच्या आत कारवाई करत ट्रॅक्टरसह चोरट्यांना जेरबंद केले आहे.

हिंगणगाव (ता. गेवराई) येथील तलाठी चंद्रकांत बाबुराव बत्तुलवार यांनी दिलेल्या



फिर्यादीनुसार, महसूल पथकाने अवैध वाळू वाहतूक करणारा ट्रॅक्टर-ट्रॉली आणि छोटा हत्ती हे वाहने २९ एप्रिल २०२६ रोजी ताब्यात घेऊन गेवराई बस आगार येथे सुरक्षेसाठी लावली होती.

मात्र, २८ जून २०२६ रोजी पहाटे २:१५ च्या सुमारास चोरट्यांनी यातील स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर व ट्रॉली चोरून नेली. याप्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल होताच गेवराई पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेल्या पथकाने अवघ्या २४ तासांत चोरीस गेलेला ट्रॅक्टर व ट्रॉली जप्त केली

## माजलगाव मधील खुनाचा गुन्हा बारा तासांत उघड ; एलसीबीची कामगिरी

माजलगाव। प्रतिनिधी

माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तालखेड गावात घडलेल्या खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवघ्या १२ तासांच्या आत अटक केली आहे. जुन्या वादाचा राग मनात धरून आरोपीने धारदार शस्त्राने तरुणाची हत्या केल्याची धक्कादायक बाब तपासात उघड झाली आहे.



तालखेड येथील विकास दत्तात्रय वाघमोडे (वय ३३) यांचा मृतदेह २९ जून २०२६ रोजी त्यांच्या शेताजवळ मिळून आला होता. या प्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा (गु.र.नं. २९३/२०२६, कलम १०३(१) भा.न्या.सं.) दाखल करण्यात आला होता.


या घटनेचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा, बीड करत होती. तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने यांना माहिती मिळाली की, मयत विकास वाघमोडे आणि आदित्य बारवाळ यांच्यात काही दिवसांपूर्वी वाद झाले होते. ◀◀ पान ३ वर

## आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघातील जिल्हा परिषद शाळांसाठी १४ कोटी १४ लाख निधीची मागणी

### आ.सुरेश धस यांच्याकडे डॉ.गणेश ढवळे यांचे निवेदन

पाटोदा । प्रतिनिधी

आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघातील जिल्हा परिषदेच्या मोडकळीस आलेल्या, इमारतविरहित तसेच नव्याने वर्गखोल्यांची आवश्यकता असलेल्या शाळांसाठी १४ कोटी १४ लाख रुपयांचा निधी जिल्हा वार्षिक नियोजन समितीच्या माध्यमातून उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी आमदार सुरेश आण्णा धस



यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात आष्टी तालुक्यातील शाळांसाठी ४ कोटी ८७ लाख, पाटोदा तालुक्यातील शाळांसाठी ४ कोटी ३७ लाख आणि शिरूर तालुक्यातील शाळांसाठी ४ कोटी ९० लाख अशा एकूण १४ कोटी १४ लाख रुपयांच्या निधीची मागणी करण्यात आली आहे.

आष्टी तालुक्यात जिल्हा परिषदेच्या एकूण २७६ शाळा असून, मोडकळीस आलेल्या ११ शाळांमधील ३१ वर्गखोल्यांचे बांधकाम तसेच विद्यार्थी संख्या वाढलेल्या ३ शाळांमध्ये ◀◀ पान ३ वर

## सततचा जाच असह्य झालेल्या पत्नीने केला दारुड्या पतीचा खून!

### अंबाजोगाई तालुक्यातील घटना; मुलाच्या फिर्यादीवरून आई विरुद्ध गुन्हा दाखल

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील पाटोदा येथे कौटुंबिक वादातून पत्नीनेच पतीचा वायरने गळा आवळून खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. दारुड्या पतीच्या सततच्या त्रासाला कंटाळून असहाय्य झालेल्या पत्नीने सुरुवातीला पतीला हृदयविकाराचा झटका आल्याचा बनाव रचला होता, मात्र अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांच्या सतर्कतेमुळे हा खोटा बनाव उधळला गेला असून खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पाटोदा येथील रहिवासी शरीफ पठाण हे नेहमी दारू पिऊन घरी येऊन पत्नी नसरीन पठाण यांच्याशी वाद घालत असत. घटनेच्या रात्री देखील पती दारूच्या नशेत सतत त्रास देत असल्याने आणि घरात वाद विकोपाला गेल्याने, अत्यंत असहाय्य झालेल्या नसरीन यांनी रागाच्या भरात घरातील काळ्या वायरने शरीफ यांचा गळा आवळून त्यांना जीवे ठार मारले. या कृत्यानंतर त्यांनी घाबरून पतीला 'हार्ट अटॅक' आल्याचा आणि ते हालचाल ◀◀ पान ३ वर

## माजलगावचे सहाय्यक निबंधक सुरज जगदाळेसह दोघे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात

माजलगाव । प्रतिनिधी

येथील शासकीय कार्यालयांमध्ये वाढत्या लाचखोरीला वेसण घालणारी एक अत्यंत मोठी आणि खळबळजनक कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने माजलगाव मध्ये केली आहे.येथील सहाय्यक निबंधक कार्यालयातील मुख्य सहाय्यक निबंधक आणि कार्यालयीन अधीक्षक यांनी एका नागरिकाला सावकारकीचा अधिकृत परवाना देण्यासाठी तब्बल २५ हजार रुपयांची लाच मागितली होती.या लाचेतील १३ हजार रुपयांची रक्कम कार्यालयातच स्वीकारताना दि ३० जुन मंगळवार रोजी दुपारी ३:०० वाजण्याच्या सुमारास जालना येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने या दोन्ही अधिकाऱ्यांसह त्यांच्या एका खाजगी हस्तकाला रंगेहात ताब्यात घेतले.या धडक कारवाईमुळे सहकार क्षेत्रात आणि शासकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार माजलगाव



येथील एका तक्रारदाराला शासकीय नियमांनुसार सावकारकीचा अधिकृत व्यवसाय करण्यासाठी नवीन परवाना हवा होता. यासाठी त्यांनी सहाय्यक निबंधक कार्यालयात अर्ज केला होता.मात्र,हा परवाना मंजूर करण्यासाठी कार्यालयात कार्यरत असलेले मुख्य सहाय्यक निबंधक सुरज जगदाळे आणि कार्यालयीन अधीक्षक सतीश शेरखाने यांनी एका खाजगी इसमाच्या (एजंट) माध्यमातून तक्रारदाराकडे २५ हजार रुपयांची उघड मागणी केली. तक्रारदाराची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी या प्रकरणी थेट लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे रीतसर तक्रार नोंदवली.

तक्रारीची शहानिशा केल्यानंतर जालना येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने दि ३० जुन मंगळवार रोजी माजलगाव येथील सहाय्यक निबंधक कार्यालयात अत्यंत गोपनीय पद्धतीने सापळा रचल्या नंतर दुपारी ठीक ३:०० वाजण्याच्या सुमारास, ठरल्याप्रमाणे तक्रारदार पैसे देण्यासाठी कार्यालयात पोहोचले.सहाय्यक निबंधक सुरज जगदाळे आणि अधीक्षक सतीश शेरखाने यांच्या संमतीने १३ हजार रुपयांची लाचेची रक्कम स्वीकारली जात असतानाच, दबा धरून बसलेल्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी तिघांवर झडप घालून त्यांना रंगेहात पकडले. लाचेची रक्कम जप्त करण्यात आली असून तिन्ही आरोपींना तात्काळ ताब्यात घेण्यात आले आहे.

## गणेश डोंगरे यांच्या तिन्ही चिमुकल्यांना कायमस्वरुपी मायेचा आधार

### प्रमोद महाजन इंग्लिश स्कूलमध्ये प्रवेश; केशवराव आंधळेंनी शिक्षण व निवासाची जबाबदारी घेतली

वडवणी । प्रतिनिधी

ऊसतोड मजूर कुटुंबावर आलेल्या दु:खाच्या प्रसंगानंतर कै. गणेश डोंगरे यांच्या तीन चिमुकल्या म लींच्या भवितव्यासाठी मायेचा आधार देत दिलेल्या वचनाप्रमाणे माजी आमदार केशवराव आंधळे व भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांनी त्यांचे शिक्षण आणि निवासाची कायमस्वरुपी व्यवस्था करण्यात आली आहे. लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे यांच्या सूचनेनुसार आणि माजी आमदार केशवदादा आंधळे यांनी दिलेल्या शब्दानुसार कै. गणेश डोंगरे यांच्या तिन्ही मुलींना आज प्रमोद महाजन इंग्लिश स्कूल, वडवणी येथे प्रवेश देण्यात आला तसेच आवश्यक ते सर्व



शैक्षणिक साहित्यही दिलेले असून त्यांना हॉस्टेलमध्ये राहण्याची कायमस्वरुपी सोयही उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सुमारे सहा महिन्यांपूर्वी ऊसतोड मजूर म्हणून काम करणारे गणेश डोंगरे हे कारखाना यार्डमध्ये बसले असतांना अचानक अंगावर ऊसाची ट्रॉली पडून यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. या घटनेमुळे त्यांच्या कुटुंबावर मोठे संकट कोसळले होते. त्यावेळी माजी आमदार केशबदादा आंधळे यांनी पुढाकार घेत डोंगरे यांच्या तिन्ही मुलींची दत्तक जबाबदारी स्विकारुन त्यांच्या संपूर्ण शिक्षणाची व निवासाची हमी दिली होती. माजी आमदार केशवराव आंधळे व संजय आंधळे यांनी दिलेल्या शब्दाची पूर्तता करत दि.२९ मंगळवार रोजी मुलींची आई श्रीमती. अश्विनताई डोंगरे, मुलींचे चुलते गोरख डोंगरे आणि आजोबा बंडूभाऊ तिडके यांच्या उपस्थितीत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. यावेळी मुलींच्या शिक्षणाची तसेच निवासाची कायमस्वरुपी व्यवस्था करण्यात आली. कै. गणेश डोंगरे यांच्या मुलींच्या आयुष्यात शिक्षणाच्या माध्यमातून नवे भविष्य घडविण्यासाठी करण्यात आलेला हा उपक्रम समाजात माणुसकीचा आणि सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण करणारा आहे. संकटग्रस्त कुटुंबाला दिलेला आधार आणि केलेली मदत यामुळे डोंगरे कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले.

## नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर होणार कठोर कारवाई

### विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी शाळा प्रशासन आणि पोलीस विभाग एकवटले

बीड । प्रतिनिधी

शहरातील विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि शाळा व्यवस्थापनासंदर्भात जिल्हा स्काऊट गाईड भवन येथे एक महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील आणि अप्पर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या बैठकीत शहरातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक व प्राचार्य उपस्थित होते. यावेळी शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ उपस्थित होते.

अलीकडेच शाळेच्या बसमधून






उतरलेल्या एका विद्यार्थिनीला रस्ता ओलांडताना झालेल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाने कडक धोरण अवलंबण्याचे ठरवले आहे.

बैठकीत घेतलेले महत्त्वाचे निर्णय:

सीसीटीव्ही आणि महिला अटेंडंट: प्रत्येक शालेय बसमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा अनिवार्य असून, प्रत्येक बसमध्ये महिला अटेंडंटची नियुक्ती करणे बंधनकारक असेल. विद्यार्थ्यांनी रस्ता ओलांडताना महिला अटेंडंटने त्यांना सुरक्षितपणे रस्ता ओलांडून द्यावा आणि बसच्या पुढून न जाता मागील बाजूने जाण्याच्या नियमांचे काटेकोर पालन करावे.

कर्मचारी पडताळणी: सर्व चालक, अटेंडंट आणि अशासकीय कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी करणे शाळा प्रशासनासाठी आवश्यक असेल.

वाहन कागदपत्रे: सर्व शालेय वाहनांची आरटीओ ◀◀ पान ३ वर

## युसूफवडगांव मध्ये दोन-दोन मटका बुक्की ओपन तर पोलीस झाले क्लोज

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसुफवडगांव येथील पोलिस स्टेशन पासुन अवघ्या हकेच्या अंतरावर दोन-दोन मटक बुकी चालु असुन याकडे मात्र युसूफवडगांव पोलिसांचे जाणिवपूर्वक अर्थपूर्ण दुर्लक्ष असुन मटक्यामुळे कित्येकांचे संसार उध्वस्त होत चालले आहेत.तरी त्यांच्यावर कधी कारवाई करणार असा प्रश्न गावकरी विचारत आहेत.

गेल्या कित्येक दिवसांपासुन युसूफवडगाव येथे अवैध धंद्यांनी धुमाकूळ घातला असुन याकडे मात्र पोलिसांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष होत आहे.पोलिस स्टेशन पासुन अवघ्या हाकेच्या अंतरावर दोन दोन मटका बुकी चालत असुन यांच्यावर कारवाई करण्यात येत नाही या मटक्यामुळे कित्येकांचे संसार उध्वस्त होत असुन सर्व सामान्य माणसांना याचे व्यसन लागलं आहे मोलमजुरी करायची आणि या आकड्याच्या खेळामधे आपले पैसे गमवायचे एवढ काम चालु असुन या आकड्याच्या खेळामुळे कित्येकांचे आयुष्य बरबाद झाले आहे तर कित्येक जण याच्या नादी लागुन बरबाद होण्याच्या मार्गांवर आहेत पण पोलीस मात्र कारवाई करायला तयार नाहीत.कारण यांच्यावर कारवाई करणे म्हणजे सोन्याची अंड देणारी कोंबडी कापुन खान्याचा प्रकार आहे.मटक्यामुळे पोलिसांना महिन्याकाठी भरपुर कमाई होते म्हणुनचे ते कारवाई करत नाहीत.त्यांना मिळणाऱ्या कमाई मुळे मग कित्येकांचे संसार आयुष्य बरबाद झाले तरी बेहतर पण ते बंद करणार नाहीत.असे असले तरी पोलिस स्टेशन प्रभारी यांनी गांभीर्याने दखल घेऊ लवकरात लवकर युसूफवडगांव मटका मुक्त करावे आणि त्यांच्यावर योग्य ती कारवाई करवी व गोरगरिबांचे संसार उध्वस्त होणार नाहीत याची खबरदारी घ्यावी अशी मागणी येथील नागरिक करत आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26